मंगळवार, ९ जुलै २०२४

⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ३०३

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 9 JULY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-303 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


## प्रत्यक्षाहुनि प्रतिमा उत्कट!



आधुनिक केसरी

**लोणार येथील प्रसिद्ध दैत्यसूदन मंदिर पावसात न्हाऊन निघाले आहे. याच पावसाच्या निश्चल पाण्यात दिसणारे मंदिराचे मनोहर प्रतिबिंब भाविकांसह पर्यटकांना मोहवून टाकत आहे. छायाचित्र : सचिन रा. कापुरे**

# मुंबईत मुसळधार

## चाकरमान्यांची तारांबळ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : रविवारी मध्यरात्रीपासून मुंबईसह उपनगरांत जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. पावसाचा जोर वाढत गेल्याने ठिकठिकाणी पाणी साचले. रेल्वे सेवा विस्कळीत झाली आहे. अशा परिस्थितीत अनेक लोकल गाड्या रद्द करण्यात आल्या होत्या. काही ठिकाणी लोकल सेवा धीम्या गतीने सुरू होती. आठवड्याच्या पहिल्या दिवशीच मुसळधार पावसाने घातलेल्या धुमाकुळामुळे मुंबईकरांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागले. मुंबईला लागून असलेल्या ठाणे जिल्ह्यातील कसारा ते टिटवाळा स्थानकांदरम्यान रुळांवर झाड पडल्याने लोकल सेवा ठप्प आहे. कल्याण ते कसारा दरम्यान ट्रॅकवर डोंगराची माती पडून ओएचईला आधार देणारा खांब वाकल्याची घटना घडली. पनवेल-कळंबोली परिसरात ट्रॅक पाण्याखाली गेला आहे.**

**लोकल ट्रेनची वाहतूक पूर्ववत**
मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे आणि हार्बर मार्गावरील वाहतूक सोमवारी सायंकाळी पुन्हा सुरू झाली. रविवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू असल्याने जागोजागी पाणी साचल्याचे दिसून आले. त्याचा परिणाम हा रस्ते वाहतूक आणि रेल्वे वाहतुकीवर झाला. मात्र सोमवारी सायंकाळी पाणी ओसरल्याने मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वेची वाहतूक सुरू झाली. कुर्ला आणि सायन दरम्यान साचलेले पाणी ओसरल्याने मध्य रेल्वेची वाहतूक पुन्हा सुरु झाली. स्लो आणि फास्ट अशा दोन्ही मार्गावरील अप आणि डाऊन दिशेची वाहतूक सुरु झाली. सीएसएमटी ते ठाणे, ठाणे ते कर्जत आणि कसारा अशी वाहतूक पुन्हा सुरु झाली तर पश्चिम रेल्वेची वाहतूक देखील सुरू असून ती थोड्या उशिराने आहे.

**तर मुंबईची तुंबई झालीच नसती :** मुंबईतील परिस्थिती पहिल्याच पावसाने भयावह झाली आहे. अनेक भाग पाण्याने तुडुंब भरले, रेल्वे व रस्ते वाहतूक ठप्प होऊन मुंबईकरांचे अतोनात हाल झाले. महानगरपालिका व रेल्वे प्रशासन यांच्यात कसलाही समन्वय नाही तर दुसरीकडे भ्रष्टाचारामुळे मुंबईकरांना शिंदे सरकारच्या पापाची फळे भोगावी लागत आहे. एकाच पावसात देशाची आर्थिक राजधानी पाण्याखाली जाते हे अत्यंत गंभीर आहे. पावसाने शिंदे-फडणवीस-अजित पवार सरकारचे पितळ उघडे पाडले असून महाभ्रष्टयुती सरकारने, चुल्लू भर पानी में मुंबई को डुबा दिया, असा घणघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. महायुती सरकारच्या कारभाराची पोलखोल करत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, मुंबई महानगर पालिकेचे कारभारी स्वत: मुख्यमंत्री आहेत पण चुकीच्या व्यक्तीच्या हातात राज्याची सुत्रे असल्याने मुंबई व महाराष्ट्राला त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत. महापालिकेच्या कार्यालयात दोन पालकमंत्र्यांची कार्यालये मुंबईकरांच्या कष्टाचे पैसे खाण्यासाठी काढली आहेत का? असा संतप्त सवाल विचारून स्वत:च्या अपयशाचे खापर मुख्यमंत्री पावसावर फोडत आहेत. हा पाऊस काही पहिल्यांदाच झालेला नाही. यापेक्षा मोठा पाऊस मुंबईत झालेला आहे पण आजच्या सारखी परिस्थिती झाली नव्हती. राजकारणापेक्षा मुंबईच्या कामात जास्त लक्ष घातले असते तर आजची परिस्थिती उद्‌भवली नसती. मुंबईत कोट्यवधी रुपयांचे सिमेंट रस्ते बांधले पण त्यात खड्डे आहेत. कोस्टल रोडच्या बोगद्याला गळती लागली, अटल सेतूला भेग्या पडल्या, हा महायुतीचा विकास आहे का? महापालिकेने मान्सूनपूर्व कामे केली, नालेसफाई केली असा सरकारचा दावा आहे तो या पावसाने खोटा ठरवला.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला आयोगाचा दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यात 10 पैकी आठ जागा जिंकून महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक स्ट्राईक रेट दिलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला केंद्रीय निवडणूक आयोगाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेसला अधिकृत मान्यता म्हणून मिळाली आहे. त्यामुळे कलम 29 ब नुसार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला आता देणगी स्वीकारता येणार आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासह शरद पवार यांना सुद्धा मोठा दिलासा मिळाला आहे.

या निर्णयानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सुप्रिया सुळे यांनी सांगितले की आज आमच्या चार वेगवेगळ्या महत्त्वाच्या सुनावण्या दिल्लीमध्ये होत्या. त्या पुढे म्हणाल्या की, शरद पवारांचा पक्षज्या पद्धतीने काढून घेतला ते पाहता जनतेने आम्हाला आशीर्वाद दिले. त्याबद्दल जनतेचे आभार मानतो. आम्हाला तुतारी हे चिन्ह तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आलं होतं, पण आम्हाला चेक घेण्याचा अधिकार देण्यात आला नव्हता. तसेच कर लाभ सुद्धा मिळत नव्हते. आता आमची विनंती मान्य करण्यात आली आहे.

त्याचबरोबर तुतारी चिन्हावरून होणाऱ्या संभ्रमावस्थेबद्दल होती. तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी दुसरी तुतारी देण्यात येऊ नये अशी विनंती केली असल्याचे सुप्रिया सुळे म्हणाल्या. असा अन्याय इतर कोणत्याही पक्षावर होऊ नये यासाठी विनंती केल्याचे सुप्रिया सुळे यांनी सांगितले. दरम्यान, शरदचंद्र पवार पक्षाकडून चिन्हासंदर्भात करण्यात आलेल्या विनंतीवर आयोगाने आम्हाला अभ्यास करू असे सांगितले असल्याचे त्यांनी सांगितले.

दुसरीकडे 16 जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेस नाव आणि चिन्हाबाबत सुनावणी होणार आहे. हा निर्णय सुद्धा कोणाच्या बाजूने जाणार? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये दहापैकी आठ खासदार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निवडून आले आहेत. त्यामुळे निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयाच्या आधारे संख्याबळाचा मुद्दा उपस्थित होऊ शकतो. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या निर्णयावर सुप्रीम कोर्ट काय निर्णय देणार? याकडे लक्ष आहे.

# वाहनाने दोन पोलिसांना चिरडले

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर बापोडीजवळ अज्ञात वाहनाने दोन पोलिसांना चिरडले. या अपघातात एका पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. तर दुसरा पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाला आहे. रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास हा अपघात झाल्याचे सांगितले जात आहे. या अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पुण्यात मध्यरात्री झालेल्या हिट अँड रन प्रकरणात पुणे पोलीस दलातील एका पोलीस कॉन्स्टेबलचा मृत्यू झाला आहे. तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर हॅरिस ब्रीजच्या खाली रात्री साधारणतः पावणे दोन वाजता हा अपघात घडला. खडकी पोलीस ठाण्यात बीट मार्शल म्हणून काम करणारे दोन पोलीस कॉन्स्टेबल रात्रीची गस्त घालण्यासाठी दुचाकीवरुन निघाले असताना, समोरून वेगानं आलेल्या चारचाकी वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातानंतर वाहनचालक वाहनासह फरार झाला. मिळालेल्या माहितीनुसार, समाधान कोळी असे मृत पोलीस कर्मचाऱ्याचं नाव आहे. तर, पी. सी. शिंदे असं जखमी पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे.

# विद्युत वितरण कंपनीच्या विरोधात बळसोंड ग्रामस्थांचा रास्ता रोको

## ठोस आश्वासनानंतर आंदोलन मागे

आधुनिक केसरी न्यूज

**गोपाल सातपुते**

**हिंगोली :** शहरालगत असलेल्या बळसोंड येथील ग्रामस्थांनी सोमवारी विद्युत वितरण कंपनीच्या विरोधात रास्ता रोको आंदोलन केले. अखेर ठोस आश्वासनानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

अकोला बायपास, बळसोंड येथे ग्रामपंचायतचे उपसरपंच प्रतिनिधी तथा भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष पप्पुभाऊ चव्हाण यांच्या नेतृत्वामध्ये रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात परिसरातील नागरिक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. मागील बऱ्याच दिवसांपासून परिसरातील वीज पुरवठा वारंवार खंडित केला जातो. कुठलेही कारण नसताना कधीकधी तर रात्रभर व दिवसाही वीज पुरवठा होत नाही. परिसरात जवळपास ९० टक्के कर्मचारी वर्ग राहतो. लाईट बिल वेळेत भरणारा वर्ग असतानासुद्धा ही समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न होत नव्हते. त्यामुळे आज मोठ्याप्रमाणात नागरिक सहभागी होऊन पप्पू चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी दिलीप माने, जयदेव माने, विनय गायकवाड, सुमित धिके, पप्पू देवकते, सत्येंद्र नालटे, विवेक देशमुख, ज्ञानदेव मांदळे, शिवाजी मांदळे, लक्ष्मण थोरात, कान्होजी थोरात, रामू थोरात,वैभव शिंदे, राजू घोडे, ओम भिसे, प्राध्यापक पवार, शिवाजी ठमके, विशाल जिरवणकर, सतीश घोरपडे, वैजनाथ खोलगाडगे, सुमित वाकळे, किसन सूर्यवंशी, अनिल गोटे,दीपक हिरास, शरद बेद्रे, रवी गायकवाड, अशोक लोंढे, उज्वला खोलगाडगे, अमोल भन्साळी, शिवाजी लोमटे, ज्ञानेश्वर राऊत, शिवाजी मांदले, आशिष शेंडे, मारुती इंगळे, मुंजाजी सुरोशे, अविनाश देशपांडे, गजानन देवकर, जाधव सर, गोलू भाई, मोहम्मद भाई, संतोष गाडे, सतीश गायकवाड, गोविंदराव भवर, नंदकिशोर पतंगे, बंटी लोणकर,जोगे सर , भवानी लाला, प्रशांत शहाणे, नितीन जयस्वाल, रितेश मुंदडा, अनिल मंदाडे, सुबोध भिसे, क्षीरसागर सर, अनिल वाघमारे, राहुल बलखंडे आदींसह या भागातील त्रस्त जनता या आंदोलनात मोठ्या संख्येने सामील झाली होती.

या ठिकाणी विजवितरण कंपनीच्या वतीने कार्यकारी अभियंता मोरे, बेलसरे कोळपे यांनी पप्पुभाऊ चव्हाण यांना समस्या सोडवण्यासाठी लेखी आश्वासन पत्र दिले. जर येत्या १५ दिवसात यावर तोडगा निघाला नाही तर याहीपेक्षा मोठ्या प्रमाणात जन आंदोलन उभे करण्यात येईल असे इशारा पप्पुभाऊ चव्हाण यांनी अधिकारी वर्गाला दिला.

ठोस आश्वासनानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी मोठया संख्येने नागरिक सहभागी झाले होते. सदरील निवेदन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी इंजिनियर मोरे, बेलसरे, कोळपे, यांनी स्वीकारले तसेच यावेळी ग्रामीण ग्रामीण पोलीस स्टेशन हिंगोली येथील अधिकारी व कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

नंतर वोडाफोनला व्हिजिटिंग फिजिशियन म्हणून जॉईन झाल्या आणि त्यासोबतच स्वतःची वैद्यकीय सेवा द्यायला सुरुवात केली. आज त्या अल्गो अनॅलिटीक्स या संस्थेत आपली सेवा देत आहेत. या ठिकाणी त्यांचे जे विविध प्रकारचे शिक्षण आतापर्यन्त झाले आहे, त्या सगळ्यांचा एकत्रित उपयोग त्यांना होतो . विशेषतः कायद्याचे ज्ञान, कंप्युटर ॲप्लिकेशन आणि वैद्यकीय शिक्षण हे सगळे ज्ञान तिथे उपयोगी पडते. अल्गो अनॅलिटिक्सला त्या पदावर काम करण्यासाठी अशाच व्यक्तीची आवश्यकता होती आणि ती त्यांना डॉ शारदा यांच्या रूपाने मिळाली. असे असले तरी डॉ शारदा यांचे सामाजिक जबाबदारीचे भान कधीही सुटत नाही. आपल्या ज्ञानाचा, शिक्षणाचा समाजासाठी काहीतरी उपयोग झाला पाहिजे याकडे नेहमीच त्यांचे लक्ष असते. त्यातूनच त्यांनी डॉक्टर आणि रुग्ण यांच्यात सध्या गैरसमजातून जो काही संघर्ष होतो आहे, तो कमी व्हावा म्हणून काही समाजसेवी डॉक्टर्स आणि जबाबदार नागरिक यांची मिळून पीसीडीएफ म्हणजेच पूना सिटीझन-डॉक्टर फोरमची स्थापना केली. आरोग्यसेवा आणि शिक्षण यांची सांगड घातली जावी. डॉक्टर आणि रुग्ण यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण व्हावे म्हणून ही संघटना प्रयत्नशील असते.




## हितगुज



पुष्प
११०वे



### गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

## सामूहिक सेवा

अन्नब्रह्माचे निर्माण करणारी सर्वांची भुक तहान भागविणारी शाकंबरी महालक्ष्मी म्हणजेच माता भगवती या राष्ट्राच्या प्राथमिक गरजा पूर्ण करणारी आहे. पंचमहाभूतांचे संतुलन करणारी, दारिद्र्य दूर करणारी, राष्ट्राला स्वावलंबी व समृद्ध बनवणारी आहे. ती मानवाच्या सदभावनेने संतुष्ट होऊन दुष्काळाचा सुकाळ करते. ती मानवाच्या उन्नत अनाचाराने क्रोधित होऊन त्याला दिन, हतबल बनवून दंड देते. प्रमत्तास दंड व भक्तास न्याय हे परमेश्वरी ब्रीद आहे. अशा निसर्ग प्रकोपापुढे विज्ञानही मौन होते. या सर्वांचा सखोल विचार करून मानवाच्या मनातील स्वार्थ, अनाचाराला आळा घालण्यासाठी, विवेक सुदृढ करण्यासाठी भगवतीची उपासना आवश्यक आहे. सप्तशतीच्या पाठांमधून मनावर होणारे संस्कार, मिळणाऱ्या प्रेरणा, जागृत आत्मशक्ती,व्यक्तिमत्व प्रगल्भ, सतेज, धैर्यवान, संयमी बनवते. लहानपणापासून अशा व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होणं हितकारक आहे. सप्तशतीचे महत्त्व ध्यानीमनी रुजले पाहिजे, तो व्यक्तिमत्त्वाचा गुण बनला पाहिजे, सप्तशती कर्तव्यात सामावली गेली पाहिजे. या दृष्टीने घर, केंद्र, शाळा या ठिकाणी सप्तशतीच्या सामूहिक पाठातून हा संस्कार रुजवण्याचा प्रयत्न व्हायला हवा. महादेवीची महाभगवतीची स्तुती सर्व देवतांनी संकट समयी, वेळोवेळी केली आहे. या महाभगवतीला तथागत गौतमाने प्रज्ञापारमिता शक्ती म्हटले आहे. करुणावत्सल जगत जननीची सेवा दुःख, व्याधी, जरा, मृत्यू यांचा विनाश करणारी आहे.मानवाला ब्रह्मांडाच्या सर्व शक्ती लाभल्या आहेत. या शक्तींचे कल्याणकारी रूप अवगत होण्यासाठी सप्तशतीच्या रूपाने सेवा रुजू करणे गरजेचे आहे.

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

कनकागिरी गावात मच्छिंद्राने गोरक्षनाथास उपदेश करून सर्व वेदशास्त्रांत प्रवीण केले, चौदा विद्याहि त्यास पक्क्या पढविल्या;



सकल अस्त्रात वाकब केले, साबरी विद्या शिकविली व सर्व देवाच्या पायांवर त्यास घातले. नरशी, कालिका, म्हंदा, म्हैशासुर, झोटिंग वेताळ, मारुती, श्रीराम इत्यादिकांची दर्शने करविली. जेव्हा रामाची भेट झाली, तेव्हा रामाने गोरक्षनाथास मांडीवर बसवून आशीर्वाद दिले. असो बावन वीरांसहवर्तमान श्रीराम, सूर्य, आदिकरून सर्वांनी गोरक्षास वरदाने दिली व त्यास तपास बसविण्यासाठी मच्छिंद्रनाथांना सांगून ते आपापल्या ठिकाणी गेले. एके दिवशी गोरक्षनाथ संजीवनीमंत्र पाठ करीत बसले होते. जवळ मच्छिंद्रनाथ नव्हते. तो एकटाच त्या ठिकाणी बसला आहे अशा संधीस गावची मुले खेळत खेळत त्याच्या जवळ गेली. ती मुले चिखलाचा गोळा घेऊन आपसात खेळत होती. त्यांनी गोरक्षास चिखलाची गाडी करावयास सांगितले, पण त्याने आपणास गाडी करता येत नाही म्हणून सांगितल्यावर ती मुले आपणच करू लागली. त्यांनी चिखलाची गाडी तयार केली. त्या गाडीवर बसावयासाठी एक गाडीवान असावा असे त्या मुलांच्या मनात येऊन ती चिखलाचा पुतळा करू लागली, परंतु त्यांना साधेना, म्हणून ती एक मातीचा पुतळा करून देण्याविषयी गोरक्षनाथाची प्रार्थना करू लागली. त्याने त्यांची ती विनवणी कबूल केली व चिखल घेऊन पुतळा करावयास आरंभ केला. गोरक्षनाथ जो चिखलाचा पुतळा करील त्यापासून गहिनीनाथाचा अवतार व्हावयाचा, वगैरे संकेत पूर्वी ठरलेला होता. त्या अन्वये त्यास पुतळा करून देण्याची बुद्धि उत्पन्न झाली. नवनारायणांपैकी करभंजन हा अवतार ह्या मातीच्या पुतळ्यापासून व्हावयाचा, म्हणून गोरक्षास तशी बुद्धि होऊन त्याने पुतळा करावयास घेतला. त्या वेळी मुखाने संजीवनी मंत्राचा पाठ चालला होता. संपूर्ण पुतळा तयार झाला अशी संधि पाहून करभंजनाने त्यात प्रवेश केला. तेव्हा अस्थी, त्वचा, मांस, रक्त इत्यादी सर्व होऊन मनुष्याचा तेजःपुंज पुतळा बनला. मग तो रडू लागला. हा आवाज जवळ असलेल्या मुलांनी ऐकिला. तेव्हा गोरक्षनाथाने भूत आणिले. असा त्या मुलांनी बोभाटा केला व लागलेच सर्वजण भिऊन पळून गेले. पुढे मार्गात मच्छिंद्रनाथांशी भेट होताच, त्याने त्या मुलास भिण्याचे व ओरड करून लगबगीने धावण्याचे कारण विचारिले व तुम्ही भिऊ नका म्हणून सांगितले. तेव्हा पुतळ्याचा मजकूर मुलांनी सांगितला. मुलांचे भाषण ऐकून मच्छिंद्रनाथ विस्मयात पडला व काय चमत्कार आहे तो आपण स्वतः डोळ्यांनी पहावा असे त्याने मनात आणिले आणि मुलांस जवळ बसवून सर्व खाणाखुणा विचारून घेतल्या.



आधुनिक केसरी

## गेले तुकाराम | वैकुंठासी ||

जरी नाशवंत | देह हा स्विकारी ||
शुचिर्भूत करी | अंतर्बाह्य ||१||
सत्कर्मचि दावी | मांगल्याची कळा ||
म्हणोनिया लळा | लागो नित्य ||२||
ज्ञान तेज दावी | तेजस्वी सद्गुण ||
सौंदर्यांची खाण | तीच आहे ||३||
ज्ञानवंता प्रिय | साधनेची दिशा ||
मितभाषी भाषा | अलंकार ||४||
देह-आत्मा ज्याचा | झाला
आत्माराम ||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अन्तरंग साधन चले,
अन्तर तर महँ ध्यान ।
शुद्ध रुप से ध्यान है, जड़ से नहिं परमान
।।३८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल दशम अध्याय) ०२/१०/३८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ब्रह्मविद्या विहंगम योगाची साधना अंतरात आत्म्याद्वारे केली जाते , याद्वारे अंतरात सूक्ष्म परब्रह्माचे ध्यान होते. सर्व देह-संघातापासून पृथक् होऊन आत्मस्वरूपाचे ज्ञान झाल्यावर, ध्यानाची साधना होते. जड करणांनी (साधनांनी) चेतन पदार्थाचे ध्यान होत नाही.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## संत वेणाबाई


आधुनिक केसरी

१६ व्या शतकात समर्थ रामदास स्वामींनी वेगळ्याच हेतूने आपले कार्य सुरू केले होते. सर्व समाज त्यांना संघटित करावयाचा होता. धर्मसंघटनेची उभारणी त्यांनी सुरू केली त्यावेळी मिरजेला त्यांची वेणाबाईंशी पहिली भेट झाली. वेणाबाई या ब्राम्हण कुटुंबात जन्मलेल्या बालविधवा होत्या. कोल्हापूरच्या गोपाजीपंत देशपांडे यांच्या वेणाताई मुलगी होत्या. लहान वयातच लग्न होऊन त्या मिरजेला सासरी गेल्या. दुर्दैवाने पतीचे निधन लवकर झाल्याने बालविधवीचे जीवन जगणे त्यांच्या नशिबी आले. त्या काळात विधवा स्त्रीने घरकाम करीत, देवाचे नाव घेत, धर्मग्रंथांचे धार्मिक ग्रंथांचे वाचन करीत आपले जीवन कंठायचे, अशी रीतच होती. समर्थ रामदास स्वामी त्याच्या घरी भिक्षा मागायला आले तेव्हा समर्थांचे त्यांना प्रथम ओझरते दर्शन झाले. काही दिवसांनी रामदास स्वामी पुन्हा त्यांच्या दारात भिक्षा मागण्यासाठी आले. तेव्हा वेणाबाई तुळशी वृंदावनापाशी एकनाथी भागवत वाचीत होत्या. समर्थांनी विचारले "मुली तुला यातले समजते का काही?" त्यावर वेणाबाईंनी समर्थांना पंचवी प्रश्न विचारले. त्या प्रश्नातून समर्थांना वेनाबाईंची. ही भेट वेणाबाईंच्या जीवनाचा रस्ता बदलणारी ठरली. रामदास स्वामींच्या भेटीचा, बोलण्याचा वेणाबाईंच्या मनावर खूप परिणाम झाला. हेच आपले गुरू आहेत. त्यांच्याकडून उपदेश घ्यावा. त्यांची सेवा करीत जीवन घालवावे. असे त्यांना वाटू लागले. रात्रंदिवस वेणाबाई त्यांचाच विचार करीत देह माझे मन माझे|सर्व नेले गुरुराजे अशी त्यांची अवस्था झाली. वेणाबाईंना कोल्हापूरला पाठवून दिले. या मूळच्या कोल्हापूर येथील राधिकाबाई आणि गोपजीपंत गोसावी यांच्या कन्या होत्या. विवाहानंतर त्या मिरज येथील देशपांडे यांच्या घरी गेल्या. काही काळातच, वयाच्या बाराव्या वर्षी विधवा झाल्या. तेथेच त्यांनी समर्थ रामदासांचे शिष्यत्व स्वीकारले. नंतर त्या मिरज येथे परत आल्या. समर्थांनी त्यांना कीर्तन करण्याची अनुमती दिली होती. त्या मध्ययुगीन काळात विधवा स्त्रीने कीर्तन करणे ही एक क्रांतीच होती. समाजाच्या उद्धारासाठी क्रांतिकारक पाऊल उचलणाऱ्या सर्वच संतांना जन निंदेला सामोरे जावे लागते. समर्थ त्याला अपवाद नव्हते. वेणाबाई, अक्काबाई, अंबिकाबाई या स्त्रियांना त्यांनी अभ्यासास प्रवृत्त केले आणि मठपती बनवले.

## भगवंताचे अनुसंधान कसे ठेवावे ?


आधुनिक केसरी

ज्या गोष्टीचे अत्यंत प्रेम आहे तिचे अनुसंधान मनुष्याला आपोआप राहते. ते इतके टिकते की ते अनुसंधान मला आहे ही जाणीवही राहत नाही. ‘ अनुसंधान ठेवतो ’ असे म्हणताना ‘ मी ’ त्याच्याहून वेगळा असतो; आणि प्रेमाचे जे अनुसंधान असते तिथे मी एकजीवच होतो. आपण कितीही गडबडीत असलो तरी वाटेने जात असताना आपल्या नावाने कुणी हाक मारली की आपण वळून पाहतो. हे आपले अनुसंधान आहे; कारण या देहावर आपले इतके काही प्रेम आहे, की मी त्याच्याहून वेगळा नाहीच ! असे देहाचे अनुसंधान कसे ठेवावे हे सांगावे लागत नाही. ‘ देहाचा विसर पाडा ’ म्हणून सांगावे लागते, ‘देहाचे स्मरण ठेवा ’ म्हणून नाही सांगावे लागत ! आम्हांला भगवंताचे अनुसंधान ठेवायचे आहे. हा एक प्रकारचा अभ्यास आहे. भगवंताचे प्रेम वाढले तर अनुसंधान टिकेल. परीक्षा पास होण्याकरिता जसा अभ्यास करावा लागतो तसा भगवंताचे प्रेम वाढविण्याकरिता अभ्यास करणे जरूर आहे. यासाठी, जे जे काही मी



करीन ते ते मी भगवंताच्या साक्षित्वाने करतो आहे ही जाणीव ठेवून करायला पाहिजे. आज आम्हांला नाना तऱ्हेचे उद्योग करावे लागतात. प्रपंच म्हटला म्हणजे किती गोष्टी कराव्या लागतात ! त्या सगळ्या गोष्टी करीत असताना भगवंताचे स्मरण ठेवून करणे, हे आपले खरे कर्तव्य आहे. सर्कशीमध्ये आपण पाहतो ना ! वाघ, सिंह, घोडे, हत्ती काय जे प्राणी असतील ते खेळ खेळतात. घोडा कसा सुंदर नाचतो असे आपण म्हणतो ! पण त्या घोड्याचे लक्ष प्रेक्षकांकडे नसते. त्या घोड्याचे, त्या वाघाचे, त्या सिंहाचे लक्ष आतमध्ये चाबूक उगारणारा जो मनुष्य असतो त्याच्याकडे असते ना ? प्रेक्षक काय म्हणतील ते तो प्राणी पाहत नाही. आणि आपण काय करतो ? भगवंत काय म्हणेल हे पाहतच नाही, जग काय म्हणेल हे पाहतो ! हे जर आम्ही सोडले ना, तर भगवंताला काय हवे आहे हे आम्हाला बरोबर कळेल. भगवंताचे स्मरण ठेवून कर्म केल्याने त्याला काय हवे तेच आमच्या हातून घडेल. त्याचे संधान न सोडता कर्म करणे हे अनुसंधानाचे लक्षण आहे. हे कशाने होईल ? अत्यंत प्रेमाने होईलच. एक बाई नुकतीच बाळंत होऊन सासरी आल्यावर तिने मूल पाळण्यात निजविले, आणि मागच्या परसामध्ये ती भांडी घाशीत होती. ते मूल थोडेसे कुठे रडले. घरात पुष्कळ माणसे होती, कुणाला ऐकू नाही गेले. ती पोरगी मात्र धावत पाळण्यापाशी आली, आणि ‘ मूल उठलेले दिसते आहे ’ असे म्हणाली. काम करताना तिचे कान जसे पाळण्याकडे होते, तसे प्रपंच करताना आपले लक्ष मात्र भगवंताकडे असले पाहिजे. याचे नाव अनुसंधान ! १९०. अखंड मुखी रामनाम, आत असावे अनुसंधान, देहाने करावे प्रपंचाचे काम.

मिथिकल पार्क : एक सांस्कृतिक दर्शन



पान ५

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, ९ जुलै २०२४
adhunikkesari.com

# कंधारचा भुईकोट किल्ला काटेरी झुडपांनी वेढला

## पर्यटकांची होते प्रचंड गैरसोय! : ऐतिहासिक राष्ट्रकूटकालीन किल्ला वृक्षवल्लींचा विळख्यात!

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**


**कंधार :** किल्ला हा महाराष्ट्राच्या नांदेड जिल्ह्यातील कंधार या तालुक्यांच्या ठिकाणी असलेल्या एक पुरातन कालीन भुईकोट किल्ला आहे. एक हजार वर्षांपूर्वीचा कंधारचा हा भुईकोट प्रकारातील किल्ला हा राष्ट्रकूट वंशामधील राज्यातील तिसरा कृष्ण याने दहाव्या शतकामध्ये बांधला आणि त्यानंतर या किल्ल्यांवर ज्यांचे वर्चस्व येईल त्यांनी हा किल्ला विकसित केला. कंधारचे पूर्वीचे नाव पंचालपुरी असून पांडवांचा द्रौपदीबरोबर विवाह याचं स्थळी झाला अशी आख्यायिका आहे.

ज्यावेळी ते राष्ट्रकुटांचे राज्य सुरू होते, त्यावेळी कंदारिया शहर त्यांची राजधानी होती. या किल्ल्याचे एकूण क्षेत्रफळ हे २४ एकर असून या किल्ल्यांच्या संरक्षणासाठी किल्ल्याभोवती एक अरुंद खंदक आहे.आणि भक्कम अशी तटबंदीची भिंत आहे. हा किल्ला राष्ट्रकूट वंशाच्या काळात कृष्णा दुर्ग या नावाने ओळखले जायचा, कंधार किल्ला कंधार या गावापासून ४ किलोमीटर अंतरावर बालाघाट डोंगर रांगेमध्ये मन्याड नदीच्या खोऱ्यामध्ये कोट बाजार परिसरात हा किल्ला वसलेला आहे. आजघडीला या किल्ल्याला काटेरी झुडपांचा-झाडांचा विळखा घातला आहे, या किल्ल्याच्या आतून बाहेरून अक्षरशा काटेरी वनस्पती,गवत, झाडे झुडपे पाणी पूर्ण किल्ला झाकून गेला आहे. विषारी सापाचा मुक्त संचार वाढला आहे. येणाऱ्या पर्यटकांना जीव मुठीत धरून किल्ला पाहावा लागतो. जागोजागी माहिती फलक लावण्यात आले आहेत. पण त्यावरील माहिती पूर्ण पाण्याने उडून गेली आहे. दिशादर्शक कोणतेच फलक कार्यान्वित नाहीत. या किल्ल्यांचा कारभार पुरातत्व विभाग औरंगाबाद विभागीय कार्यालयामार्फत यांच्या नियंत्रणाखाली चालतो.

किल्ला पाहण्यासाठी हैदराबाद निजामबाद तेलंगणा आंध्र प्रदेश कर्नाटक राज्यासह लातूर परभणी सोलापूर जालना हिंगोली नांदेड इतर राज्यातून पर्यटक येथे येत असतात पण येथे येऊन किल्ला पाहिल्यावर किल्ल्याची काय दुरावस्था झाली असे बोलून जातात. किल्ल्यावर पाहण्यासारखी ठिकाणे माचाली दरवाजा, सुंदरशी भिंतीवर कोरलेली शिल्प, मंदिरे, लाल महाल, राणी महल, शीश महल, अंबरखाना, दरबार महल, कसबत महल, दोन विहिरी, दोन तोफा यांना सुद्धा काटेरी झुडपे व गवताने विळखा घातल आहे. किल्ल्याभोवती भक्कम अशी तटबंदी व त्या भोवती असणाऱ्या खंदकामधील पाण्यात जल प्राणी वनस्पती, शेवाळ तसेच काटेरी झुडपे खचाखच भरून गेले आहेत. आता शाळा महाविद्यालय सुरूवात



झाली आहे. वेगवेगळ्या जिल्ह्यातून, परराज्यातून सहली तसेच पर्यटक येत असतात. त्या अगोदर प्रशासन या लोकप्रतिनिधीने लक्ष घालावे, असे परिसरातून, पर्यटकांमध्ये मधून बोलले जात आहे. जागोजागी कचऱ्याचे ढीग पूर्ण भिंतीवर गवत झुडपे इतर वेगवेगळ्या वनस्पती ठाणं मांडून बसले आहेत, किल्ल्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय, आसन व्यवस्था, मार्गदर्शक, स्वच्छतागृह, विद्युत व्यवस्था, वाहनतळ, पोलीस चौकी आदी असुविधांमुळे पर्यटकात नाराजी वाढत आहे. कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांना मात्र अधिकचा भार पेलताना नाकीनऊ येत आहे.



## आला आषाढ आषाढ

आधुनिक केसरी

आला आषाढ आषाढ
आला आषाढ आषाढ
मन झाले ओलेचिंब
चंद्रभागेच्या पाण्यात
विठ्ठलाचे प्रतिबिंब

आला आषाढ आषाढ
मन झाले कासावीस
कधी पाहीन श्रीमुख
कधी जाईन वारीस

आला आषाढ आषाढ
बोले मनात तुळस
चल जाऊ पंढरीस
भेटू सावळ्या विठूस

आला आषाढ आषाढ
ढग भरले आकाश
मन ओथंबले खास
त्यात सावळा प्रकाश

आला आषाढ आषाढ
दिसे पंढरीची वाट
दिंड्या चालल्या मार्गात
काय सांगू त्यांचा थाट

आला आषाढ आषाढ
नको वाटे हा संसार
धावे मन पंढरीस
मनी भक्तीचा संचार

आला आषाढ आषाढ
नाम गजर विठूचा
टाळ मृदुंग जोशात
मार्ग दिसेना पुढचा

आला आषाढ आषाढ
मनी दिसे चंद्रभागा
विटेवरी दिसे उभा
दिव्य लावण्याचा गाभा

© सौ. अनघा पतके.
खंडाळा.जि.सातारा
9764860296...



## 'नीट' पुन्हा घेण्याचे निर्देश

आधुनिक केसरी

नीट परीक्षेचा पेपर लीक झाला हे सर्वांनाच माहिती असून हा पेपर कशा पद्धतीने लीक झाला, यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत, अशी टीप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. तसेच जर या परीक्षेचा पेपर व्यापक स्वरुपात लीक झाला असेल, तर आम्हाला ही परीक्षा पुन्हा घेण्याचे निर्देश द्यावे लागतील, असेही न्यायालयाने म्हटले आहे. यूजीसी-नीट पेपर लीक प्रकरणातील दाखल विविध याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयाचे सुनावणी पार पाडली असून यावेळी सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रश्न उपस्थित केले. सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड म्हणाले, पेपर लीक झाला हे सर्वांना माहिती आहे. मात्र, तो पेपर कशापद्धतीने लीक झाला, हे बघणंदेखील महत्त्वाचे आहे. तसेच जर पेपर सोशल मीडियाच्या माध्यमातून लीक झाला असेल तर आम्हाला ही परीक्षा पुन्हा घेण्याचे निर्देश द्यावे लागतील. मात्र, केवळ दोन-तीन विद्यार्थ्यांनी काही चुकीचं कृत्य केलं असेल, तर त्यासाठी संपूर्ण परीक्षा रद्द करता येणार नाही. हा २३ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे, अशी टीप्पणीही सरन्यायाधीशांनी केली. या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने एनटीएला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले. नीट परीक्षेचा पेपर केव्हा लीक झाला? पेपल लीक झाल्याची तारीख अणि प्रत्यक्ष परीक्षा यांच्यात नेमका किती कालावधी होता? यासंदर्भातील प्रतिज्ञापत्र पुढील सुनावणीपूर्वी सादर करा, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं. तसेच याप्रकरणी सीबीआयने आतापर्यंत काय कारवाई केली? याबाबतची माहिती सादर करण्याचे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने दिले. दरम्यान, याप्रकरणाची पुढील सुनावणी आता गुरुवारी ११ जुलै रोजी होणार आहे. त्यापूर्वी एनटीए आणि सीबीआयने अहवाल सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

## पिंक रिक्षा, लाडकी बहीण आर्थिक उन्नतीचा मार्ग



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या इतिहासात महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी खऱ्या अर्थाने पुढाकार घेतला तो विद्यमान शिंदे-फडणवीस-पवार सरकारने, लाडकी बहिण असो त्यांच्या आरोग्य रक्षणासाठी निधीची तरतुद असो किंवा पिंक रिक्षा योजना ज्यातुन खऱ्या अर्थाने स्वयंरोजगार निर्मिती महिला भगिनी केल्याशिवाय रहाणार नाही. वास्तविक पहाता सरकारने कल्याणकारी योजना राबवल्या तर खऱ्या अर्थाने विरोधकांनी स्वागत करायला हवं. मात्र डोक्यात केवळ विरोधाला विरोध हीच भुमिका असेल तर अशा कल्याणकारी योजना त्यांच्या दृष्टीने शुन्य असतात.**

सद्या विरोधक असलेले अनेक वर्षे सत्ता पदावर होते. मात्र महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी अशा प्रकारच्या योजना कधीच इतिहासात राबवलेल्या नाहीत ज्याचे साक्षीदार शरदचंद्रजी पवार, पृथ्वीराज चव्हाण ही मंडळी याचि देहि, याचि डोळा मागे आणि आज पहाताना दिसते. या दशकात केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात भाजपा साथीने असलेले सरकार यांनी नेहमीच महिला सक्षमीकरणाचे विषय अजिंड्यावर ठेवले. जो सामाजिक बदल महिला वर्गामध्ये झालेला दिसतो तो या दशकात निश्चितच म्हणावा लागेल. सर्व क्षेत्रात महिलांना सोबत घेण्याचे काम केंद्र आणि राज्य पातळीवर होत असताना महिला आरक्षणाचा प्रश्न देखील खमक्या पंतप्रधानांनी सोडवुन दाखवला. असं एक क्षेत्र देशात नाही जिथे महिलांचा शिरकाव आढळुन येत नाही. हरेक क्षेत्रात महिला पुरूषांच्या बरोबरीने दिसुन येतात. त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम मोदीजी सारख्या नेतृत्वाने नेहमीच केलं. राज्यामध्ये भाजपाचं सरकार जेव्हा असतं तेव्हा खऱ्या अर्थाने महिलांना न्याय देण्याचे काम अधिक झालं. शरदचंद्र पवार, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले ही मंडळी अनेक वर्षापासुन सत्ताच्या पदावर पण त्यांनी कधीच स्वतंत्र महिलांच्या विषयी भुमिका सरकार म्हणुन घेतली नाही. खरं तर पवारांनी आत्मपरीक्षण केलं तर त्यांच्या काळात महिला सक्षमीकरणाचे प्रश्न मार्गी लागलेच नाहीत. मागच्या आठवड्यात उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांनी अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना जाहिर करून प्रत्येक महिलांच्या नावे १५०० रूपये प्रतिमहा जमा होणार त्यासाठी ४६ हजार कोटीची आर्थिक तरतुद करून टाकली. चालु महिन्यापासुन योजना देखील कार्यान्वित झाली. खरं तर शिंदे-फडणवीस-पवार सरकारचे अभिनंदन यासाठी करायला हवं एवढा क्रांतीकारी निर्णय पुर्वी कधीच झाला नाही. गोरगरिब तथा आर्थिकदृष्ट्या असक्षम असलेल्या महिलांना अशा योजनेचा निश्चित फायदा होईल. विरोधकांनी योजनेला विरोध केला. कारण कळत नसलं तरी सामाजिक प्रश्नावर विरोधकांनाही भान असायला हवं. बहिण लाडकी केवळ सत्ताधाऱ्याचीच असते असं नव्हे किंवा माय-बाप सरकार जेव्हा सामाजिक निर्णय घेते त्यावेळी राज्यातील सर्व समावेशक लोकांच्या दृष्टीने ते निर्णय फायद्याचे ठरतात. इतर अनेक निर्णय महिलांच्यासाठी सरकार घेतलेले आहेतच पण दुसरा एक महत्वाचा निर्णय तो म्हणजे पिंक रिक्षा योजना. प्रत्येक जिल्ह्यात महिला बाल कल्याण यांच्या राखीव निधीद्वारे यासाठी तरतुद करण्यात आली असुन स्वयंरोजगार निर्मिती शिवाय सुरक्षित प्रवासासाठी दहा हजार पिंक ई-रिक्षा खरेदी करण्याची सरकारने घोषणा केली. लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार योजनेचा विस्तार जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत महिला व बाल कल्याणासाठी राखीव ३टक्के निधीतुन जिल्हा व तालुका स्तरापर्यंत चालु करण्याचा सरकारने निर्णय घेतला आहे. प्रत्येक जिल्ह्यात ५०० पिंक ई-रिक्षा उपलब्ध करून देण्यात येतील असेही सरकारने सांगितले. गंमत बघा, महिलांना आर्थिकदृष्ट्या स्ववलंबी बनवण्यासाठी सरकारने उचललेले हे पाऊल तसं पाहता अत्यंत उपयुक्त होय. एवढा खोलवर जावुन विचार कुठल्याही सरकारने पुर्वी केला नाही. २०१९ ला महाविकास आघाडीचं सरकार उबाठा नेते उद्धव ठाकरे यांच्या पाठिंब्याने आल्यानंतर अडीच वर्षात एकही निर्णय ठाकरे सरकारने महिलांच्यासाठी योग्यतेचा घेतला नाही. याउलट किराणा दुकानातुन दारू विकण्याचा निर्णय घेतला तेव्हा संपुर्ण राज्यात महिला संतापाचा उद्रेक झाला होता. विद्यमान राज्य सरकारने केवळ घोषणा केल्या नाहीत तर त्याच्या अंमलबजावणीला सुरूवात झाली असुन लाडक्या बहिणीला तर फॉर्म भरायला दिसुन येत असलेली प्रचंड गर्दी आनंदाची गोष्ट वाटते. पिंक रिक्षा एका महिलेच्या हाती जेव्हा येईल तेव्हा प्रवास सुरक्षित असेल आणि सर्वात कुठलेही प्रदुषण नसेल आणि स्वतःच्या स्वावलंबी जीवनासाठी या साधनाची उपयुक्तता महत्वाची ठरेल. मिळाले तर किती चांगलं? एका गरजु भगिनीला ई-रिक्षा हातात पडला तर तिच्या स्वावलंबी जीवनाचा मार्ग किती सुखकर? एक गोष्ट खरी आहे की, चंगळवादाच्या युगात श्रीमंतांना गोरगरिब महिलांच्या प्रश्नाची जाणिव कशी असणार? कारण महाविकास आघाडीचे सर्व विरोधक ज्या प्रकारे राज्य सरकारच्या चांगल्या निर्णयाला विरोध करतात त्यावरून असं लक्षात येतं की यांना केवळ राजकारण कुठल्याही प्रश्नावर करायचं आणि लोकांची दिशाभुल करून सामान्य जनतेच्या मनावर सरकारविषयी निगेटिव्ह वातावरण तयार करायचं. गंमत बघा, भारतीय खेळाडूंनी विश्वचषक जिंकला. राज्य सरकारने खेळाडूंचे जोरदार स्वागत करताना विधिमंडळात त्यांचा सत्कार केला. शिंदे-फडणवीस-पवार सरकारने ११ कोटी रूपायाचे बक्षिस जाहिर केले. खरं तर भारतीय खेळाडूंना प्रोत्साहित करण्यासाठी केवढा समर्पक निर्णय म्हणावा लागेल. मात्र विजय वडेट्टीवार ज्यांच्या डोळ्याला नेहमी पिवळं दिसतं. त्यामुळे ११ कोटी का दिल्याचा सवाल त्यांनी केला.




विरोधक चांगल्या प्रश्नावर राजकारण जेव्हा करतात तेव्हा अशा लोकांना सामान्य जनतेच्या भल्याचं काही सुचत नाही आणि सत्ताधाऱ्यांनी चांगले निर्णय घेतले तर खपत नाही अशी परिस्थिती म्हणावी लागेल. मी खातो खोबऱ्याची वडी आणि महाविकास आघाडीच्या पोटात सामान्य जनतेच्या बाबतीत द्वेषाची अडी, कुठल्याही चांगल्या निर्णयांत येत नाही त्यांना कशाची गोडी? असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही. कधी कधी शरद पवारांचही नवल वाटतं की त्यांना अशा सामाजिक प्रश्नाचंही स्वागत करावं वाटत नाही. कुठल्याही प्रश्नावर राजकारण करायचं आणि रंगाचा बेरंग करून टाकायची ही त्यांची मुळात सवयच म्हणावी लागेल. खरंच त्यांना असं का वाटत नसावं? की एका भगिनीला १५०० रूपये अंबादास दानवेंनी देखील यावर आक्षेप घेतला. गंमत बघा, जो क्रिकेट खेळ भारतीयांचा आत्मा बनलेला आहे, अशा खेळामध्ये ही मंडळी राजकारण करते तर नैतिकदृष्ट्या यांना मतदारांच्या समोर जाण्याचा अधिकार तरी आहे काय? तुम्हाला महिलांचं कल्याण केल्याचं जमत नाही, खेळाडूला सरकारने मदत केल्याचे जमत नाही, शेतकऱ्यांसाठी चांगले निर्णय घेतले तेही जमत नाही, केवळ विधानसभा निवडणुकीवर डोळा ठेवायचा आणि प्रत्येक विधायक निर्णयाचा विरोध करायचा एवढंच राजकिय भांडवल सत्ताधाऱ्याच्या विरोधात महाविकास आघाडीच्या नेत्यांनी हाती घेतलं असुन त्यासाठी गोंधळात गोंधळ त्यांचा सुरू असल्याचे लक्षात येतं.

## नीटचा घोटाळा मराठी मालिकेत !



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**शीर्षक वाचूनच अनेकांच्या भुवया उंचावतात. मनात प्रश्न निर्माण होतील.मराठी मालिकेत नीट परीक्षेचा घोटाळा कसा काय पोहोचू शकतो? म्हणजे या घोटाळ्याचे धागे दोरे मराठी मलिकेपर्यंत कसा प्रवास करू शकता.तसे घडले आहे खरे! आई कुठे काय करते या मालिकेच्या ताजा एपिसोड मध्ये आपल्याला स्पर्धा परीक्षेतला घोटाळा दिसतो. ही मालिका दुधात पाणी टाकून पांचट रतीब घातल्या सारखी चालू आहे.याच नव्हे तर प्रत्येक मालिकेत प्रेक्षकांचा अंत पाहणे सुरू आहे. आई कुठे काय करते मधील इतकी सहनशील, सोशिक, समंजस स्त्री अवती भवती कुठे दिसते का हे खूप शोधून पाहिले.पण स्वार्थाच्या वर्तुळात गोल गोल फिरत असलेली नातीच जास्त दिसतात.**

ही आई आता एका पाक कला स्पर्धेत आपल्या नुकत्याच मालिकेत नव्याने प्रवेश केलेल्या हिंदी भाषिक शिष्या सोबत जोडीने भाग घेते आहे. आईला म्हणजे अरुंधतीला या स्पर्धेत मिळणाऱ्या लाखो रुपयांच्या बक्षिसांचे आकर्षण आहे.ते पैसे ती आपल्या माजी नवऱ्याला देऊन सासऱ्याचे घर नवऱ्याच्या पंजातून सोडविणार आहे. इतके लाखो रुपये कुठल्या टी वी च्यानल स्पर्धेत मिळतात असा प्रश्न पडतो.पण अशा तर्कां ना मालिकेत वाव नसतो.तर्क गहाण ठेऊनच मालिका लिहिल्या जातात.तर या पाक स्पर्धेत अरुंधती आई चा पराभव करण्या साठी तिची सवत म्हणजे तिच्या माजी नवऱ्याची दुसरी बायको संजना उडी घेते! त्यासाठी ती आपल्या दुसऱ्या,घटस्फोटा ची केस पेंडींग असलेल्या नवऱ्याला तयार करते. इथेच नीट सारखा घोटाळा सुरू होतो.
या मालिकेत देशी विदेशी म्हणजे कॉन्टिनेन्टल, चायनीज वगैरे सर्व पदार्थ येणे अपेक्षित आहे.अरुंधती घरकामात,सर्व घरगुती पदार्थ करण्यात एक्स्पर्ट आहे.तिचे मालिकेत अर्धे आयुष्य स्वयंपाक घरातच गेले आहे.पूर्वार्धात घर एके घर हेच तिचे आयुष्य होते.आताशा तिला बाहेरचे जग बघायला मिळते आहे.मोकळ्या हवेत फिरायला मिळते आहे.पण स्पर्धेच्या नावाने ती पुरती गोंधळली आहे. नवा नवखा शिष्य या आजी झालेल्या आईला धीर देतो आहे.
तिकडे संजना ने तर कधीही स्वयंपाक केलेला नाही. ती घरात दुसऱ्यांना ऑर्डर सोडत असते.सदा नटून थटून बाहेर भटकत( उंडारत) असते.तिचा कामचुकार नवरा घरात दुसऱ्यावर ओरडण्यात एक्स्पर्ट आहे.त्याला चहा सुध्दा करता येत नाही.तरी हे दोघे कितीतरी लाखाचे बक्षित असलेल्या या पाक स्पर्धेत उतरले आहे.एकच उद्देशाने.कसेही करून सवतीला हारवायचे! म्हणजे आपण योग्य नसलो तरी दुसऱ्या योग्य व्यक्तीने जिंकायला नको.हीच वृत्ती जी अवती भवती बोकाळली आहे समाजात!
इथेच नीट परीक्षे सारखा घोटाळा सुरू होतो.संजना परीक्षक,स्पर्धेचे आयोजक म्यानेज करते.त्यासाठी ती बिहार गुजराथ ला गेली होती का, अन् नीट घोटाळा करणाऱ्या गुंडा कडून, पालका कडून, विद्यार्थ्यां कडून तिने प्रशिक्षण घेतले होते का,हे विद्वान लेखक, दिग्दर्शक ,निर्माते यांनाच ठाऊक.अशा दुधात पाणी घालून तयार केलेल्या अतार्किक, निर्बुद्ध मालिकांच्या निर्मात्या,दिग्दर्शिका, लेखिका या स्त्रिया असतात हा केवळ योगायोग समजावा!स्त्रियाच स्त्रियांच्या दुःखाला कारणीभूत असतात हे आपण रामायण, महाभारत काळा पासून बघत आलोय.त्यामुळे त्याची आपल्याला आता सवय झाली आहे. आता या स्पर्धेचा पहिल्या फेरीचा निकाल लागलाय. त्यात सुगरण आजीबाईचा वयाच्या महिला बाद झाल्या.मालिका पुढे ट्विस्ट अन् टर्न देऊन, प्रेक्षकां चा अंत पाहत पुढे रेटायची असल्याने अरुंधती अन् तिच्या शिष्याचा विजय झाला आहे.पण आश्चर्य म्हणजे संजना,अनिरुध्द ही टीम देखील नीट परीक्षे सारखा घोटाळा करून या प्रवेश परीक्षेत यशस्वी झाली आहे.त्यांना किती ग्रेस मार्क मिळाले हे दाखवले नाही अजून.नीट सारखे हे प्रकरण कोर्टात किंवा सी आय डी कडे जाते का हे पाहणे गमतीचे ठरेल. आजकाल एकूणच मराठी मालिकांनी प्रेक्षकांचा अंत पहायला सुरवात केली आहे.पूर्वी तेरा भागात मालिका संपायची.ते छान होते.कंटाळा येत नसे.आता तर वर्षानुवर्षे तेच ते कलाकार दळण दळताना दिसतात.त्यांनाही कंटाळा कसा येत नाही याचे आश्चर्य वाटते.पोटासाठी काहीही ही त्यामागे भूमिका असू शकते.विनोदी मालिकांनी तर कहर च केलाय.पुरुष स्त्रियांचा वेष घालून किती विचित्र,ओंगळवाणे दिसतात.पण याविरुद्ध प्रेक्षकांनी निषेध कुठे नोंडवायचा? प्रपंच,आभाळमाया,या सुखानो या,खानदान,रजनी, बूनियाद या जुन्या मालिकांचे दिवस आठवले की गहिवरून येते.पण मराठी मालिकेतही नीट परीक्षे सारखे घोटाळे करण्यात धन्यता मानणाऱ्या आजच्या लेखिका,दिग्दर्शिकाना जुन्या प्रेक्षकांचे अश्रू दिसणार नाहीत!आलीय भोगासी असावे सादर म्हणत तेच ते बघणे आपल्या नशिबी आहे खरे!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मिथिकल पार्क : एक सांस्कृतिक दर्शन







आधुनिक केसरी

भारत हा संस्कृती प्रधान देश आहे इथल्या संस्कृतीला हजारों वर्षाचा इतिहास आहे.  ही  संस्कृती नवीन पिढीला खूप कमी ज्ञात असते.  वेरूळ हे नाव जगप्रसिद्ध लेण्यांसाठी प्रसिद्ध आहे तसेच येथे आता "मिथिकल पार्क" या नावाने एक भव्य पार्क तयार करण्यात आले आहे. जे एमटीडिसीच्या भव्य 20 एकर जागेत स्थापन करण्यात आले आहे जे लहान-थोरांना खूप आकर्षित करीत आहे.  हे अतिशय मोठे संग्रहालय आहे शिक्षण, इतिहास, विज्ञान यांचा अनोखा संगम येथे पहावयास मिळतो.

जगप्रसिद्ध एलोरा लेण्यांच्या भव्य पार्श्वभूमीवर वसलेले, पौराणिक उद्यान हे मनोरंजन, संस्कृती आणि इतिहासाची दोलायमान टेपेस्ट्री आहे.  प्रत्येक भेट एक अविस्मरणीय साहस आहे याची खात्री करून आम्ही एक अद्वितीय गंतव्यस्थान ऑफर करतो जिथे मिथक जीवनात येतात.  पौराणिक उद्यान हे फक्त एक मनोरंजन उद्यान आहे.  हा इतिहास, संस्कृती, कला आणि काल्पनिक गोष्टींचा एक चैतन्यशील उत्सव आहे, जो एक एक प्रकारचा अनुभव प्रदान करतो जो आधुनिक आकर्षणांच्या उत्साहासह प्राचीन मिथकांचे अखंडपणे मिश्रण करतो.

आपण जेंव्हा सहलीच्या निमित्ताने वेरुळ लेणी बघण्यास येतो तेंव्हा वेरुळ लेणीच्या समोरच हे पार्क वसलेले आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना ही शैक्षणिक मेजवानीच आहे. ही संधी विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकणारी ठरणार आहे. निसर्गाच्या सानिध्यात प्रशस्त जागेत, भरपूर मोठ्या पार्किंगसह, खेळण्यासाठी गार्डन, मिनी ट्रेन, कॅन्टीनची व्यवस्था, अनेक म्युझियम्स  यामध्ये जुन्या नाण्यांचे म्युझियम, अति प्राचीन काळातील शस्त्रांपासून ते आजपर्यंतचे आधुनिक शस्त्र यांचे म्युझियम, अगदी जुन्या काळातील हॉलिवूड आणि बॉलीवूड पिक्चर मध्ये वापरले गेलेले हिरो हिरोइन्सच्या ड्रेसचे म्युझियम - भारतीय सिनेमाने प्रेरित केलेले पोशाख संस्कृती, रंग आणि शैली एकत्र आणतात, ज्यामुळे ते येथील  पौराणिक उद्यानातील पोशाख संग्रहालयासाठी योग्य बनतात.  या क्युरेटेड कलेक्शनमध्ये अनेक बॉलीवूड चित्रपटांमधील आयकॉनिक जोड्या  आहेत.  क्लिष्ट भरतकाम असलेल्या भव्य पोशाखांपासून ते समृद्ध पोत आणि पारंपारिक आकृतिबंधांनी सजलेल्या भव्य शेरवानीपर्यंत विविधता स्पष्ट आहे. या कलेक्शनमधील प्रत्येक कपड्यात बॉलिवूडच्या ग्लॅमरचे सार दिसून येते.  हे पोशाख केवळ सिनेमॅटिक प्रभाव दाखवत नाहीत तर भारतीय सिनेमाची व्याख्या करणारी वैविध्यपूर्ण सांस्कृतिक टेपेस्ट्री देखील प्रतिबिंबित करतात. प्रत्येक तुकडा त्याच्या वारशाचा अविभाज्य भाग बनलेल्या मनमोहक फॅशनचा पुरावा आहे.  हे प्रदर्शन सिनेमॅटिक कलात्मकतेचा आणि भारतीय सिनेमाच्या जगामध्ये अंतर्भूत सांस्कृतिक समृद्धीचा उत्सव आहे. जुन्या काळातील टाईप रायटर मशिन्स, जुने रेडिओ टेप रेकॉर्डर, संगीत साधनांचे म्युझियम, प्राचीन काळातील गाड्या, चित्रपटात वापरण्यात येणारे सेटस यांचे डेमो सेटस, पिक्चर बनविण्यासाठी जुन्या काळात वापरण्यात येणाऱ्या कॅमेर्‍याचे म्युझियम तसेच कार्निवल गेम येथे अतिथी उत्साहवर्धक उत्साह आणि मैत्रीपूर्ण स्पर्धेच्या वातावरणात स्वतःला विसर्जित करू शकतात. आम्ही विविध प्रकारचे पारंपारिक गेम स्टॉल ऑफर करतो, प्रत्येकामध्ये रिंग टॉस, बलून डार्ट्स, हूप शूट्स आणि लकी ड्रॉ यांसारखे प्रिय क्लासिक गेम आहेत.  या कालातीत क्रियाकलाप सर्व वयोगटातील अभ्यागतांना सहभागी होण्यासाठी आमंत्रित करतात व  मजा आणि आव्हानाची पातळी वाढवतात. वेरूळच्या मुख्य 15 नंबरच्या लेणीची हुबेहूब प्रतिकृती व लेणीतील 200 पेंटिंग्स इथे सर्वांचे लक्ष वेधून घेतात.

**संजय व्यापारी**

औरंगाबादच्या कोणत्याही भेटीचा अत्यावश्यक भाग असलेल्या कैलास मंदिर संग्रहालयातील कैलास मंदिराच्या मनोरंजक कथेमध्ये स्वतःला मग्न करा.  कैलास मंदिराच्या चमत्काराला समर्पित असलेले हे संग्रहालय जगातील सर्वात आश्चर्यकारक वास्तुशिल्पीय पराक्रमांपैकी एकाचे सखोल अन्वेषण प्रदान करते.अजिंठा लेणी सुशोभित करणाऱ्या प्राचीन कलेला श्रद्धांजली म्हणून प्रसिद्ध अजिंठा एलोरा पेंटिंग्ज जिवंत करणाऱ्या उल्लेखनीय गॅलरीमध्ये जा. लेण्यांमधील मूळ उत्कृष्ट नमुने वयाची आणि क्षीणतेची चिन्हे दाखवत असताना, आमची गॅलरी या ऐतिहासिक कलाकृतींना त्यांच्या संपूर्ण वैभवात अनुभवण्याची एक अनोखी संधी देते, त्यांच्या मूळ वैभवाला प्रतिबिंबित करण्यासाठी बारकाईने पुनर्निर्मित केले आहे. जुने टांगे, जुन्या बैलगाड्या, जुने शिवकालीन संदूक, राजे महाराजांच्या काळातील भव्य दरवाजे, खिडक्या अशा अनेक प्राचीन वस्तू येथे पाहायला मिळणार आहेत. आमच्या महाराष्ट्रातील मनोरंजन उद्यान ‘आयल्युजन’ येथे आश्चर्याचे जग शोधा, जिथे एक अनोखा दृश्य भ्रम अनुभव तुमची वाट पाहत आहे.  मित्र आणि कुटुंबियांसोबत सहलीसाठी योग्य असलेल्या या मंत्रमुग्ध क्षेत्रात तुम्ही पाऊल टाकताच, तुमच्या संवेदना जागृत करण्यासाठी आणि तुमच्या धारणांना आव्हान देण्याची तयारी करा.  आमची एक-एक-प्रकारची भ्रम गॅलरी आकर्षक आणि परस्परसंवादी प्रदर्शनांची श्रेणी ऑफर करते, प्रत्येक डोळा फसवण्यासाठी आणि मनाला आनंद देण्यासाठी डिझाइन केलेले. मिथिकल पार्कच्या सिनेमात तुमचे स्वागत आहे - 'औरंगाबाद आणि तुमच्या अजिंठा एलोरा ट्रिपमध्ये करायच्या गोष्टी'चा एक चमकदार कोनशिला.  आमचा थीम पार्क सिनेमाची जादू साजरी करतो, चित्रपट रसिकांना आणि कुटुंबांसाठी एक अतुलनीय अनुभव देतो.अजिंठा आणि एलोराच्या प्राचीन चमत्कारांचा शोध घेऊन तुम्ही औरंगाबादमध्ये प्रवास सुरू करता, मिथिकल पार्कचा सिनेमा साहसी आणि सिनेमॅटिक आश्चर्याचा उत्तम मिलाफ देतो.  हे केवळ चित्रपटगृह नाही, हे एक तल्लीन करणारे जग आहे जिथे थीम पार्कच्या आकर्षणाचा उत्साह आयकॉनिक मूव्ही क्षणांच्या मंत्रमुग्धतेला भेटतो.शाळेच्या गेटटुगेदर साठी, व्यावसायिकांच्या बिझनेस कॉन्फरन्स साठी, वाढदिवस पार्टीचा  छान इव्हेंट इथे होऊ शकतो. इथे साधारण 500 व्यक्तींकरिता आऊट डोअर थेटर पण आहे. एकदा भेट दिल्या शिवाय या जागेचा महिमा कळत नाही.



मिथिकल पार्क्स
Mythical Parks
where fun never ends!

ADDRESS. ELLORA VISITOR CENTRE OPPOSITE ELLORA CAVES AURANGABAD, MAHARASHTRA - 431102. GET IN TOUCH. 8605556661 / 8605556662 · INFO@MYTHICALPARKS.COM







# नवदांपत्यांचे घटस्फोट समाजासाठी चिंताजनक

## ॲड. विलास आसणे

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** लग्नात सात जन्म सोबत राहण्याची शपथ घेणाऱ्या नवदाम्पत्यात  उडणारे खटके त्यातून तुटेपर्यंत ताणले जात आहे समाजात घटस्फोट घेऊन संसाराचा धागा तुटत असून काडीमोड घेण्याचे प्रमाण धक्कादायक असून मुला मुलींची  सोयरीक जमवताना लोक ताकही फुकून पीत आहे दोघांच्या पसंती शिवाय रेशीमगाठ बांधली जात नाही जीवापाड प्रेम करणारे वधू वर लग्नानंतर आठ दहा महिन्यातच वैचारिक मतभेदातुन  ग्रहकलंह  आर्थिक चंचन  व्यावसायिक अडचणी यामुळे ताणले जातात नातेवाईक समजूत काढतात पण मन जुळत नाही हे प्रकरण थेट विभक्त  होण्यावर येते त्यातून लव मॅरेज व अरेंज मॅरेज या दोन्ही प्रकारात एकमेकांच्या संमतीने होणारे घटस्फोट समाजासाठी चिंतनाची बाब ठरू पाहत आहे असे मत शिर्डी येथील वकील विलास आसणे यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

आसणे म्हणाले की पूर्वीच्या काळात  विवाह नंतर मुले होत नाही घरगुती छळ अशी कारणे असत मात्र सोशल मीडियाच्या जमान्यात एकत्रित कुटुंब वैचारिक मतभेद वेगळी लाईफस्टाईल मोबाईल मुळे संशय विवाहबाह्य संबंध व्यसनाधीनता कौटुंबिक जात आर्थिक चंचन एकमेकांना समजून न घेण्याची भुमिका यामुळे संसाराची घडी विस्कटत आहे परस्परांना समजावून घेणे विवाह ठरवण्याची पद्धत आई-वडील नातेवाईकाकडून बदललेल्या अपेक्षांचा विचार न करता विवाह ठरवले जात आहे हे देखील संसार काडीमोल होण्यासाठी कारण ठरु पाहत आहे त्यासाठी आता एकमेकाचा स्वभाव कसा आहे याची देखील माहिती घेतली पाहिजे नाहीतर केवळ एकमेकाचा स्वभाव देखील संसार तुटण्यासाठी कारण ठरत आहे अशी खंत आसणे यांनी व्यक्त केली.



# साईबाबा सुपर हॉस्पिटलमध्ये ऑनलाइन पैसे स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करा

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** येथे औषध उपचार घेण्यासाठी महाराष्ट्रातील विविध भागातून मोठ्या प्रमाणावर रुग्ण वैद्यकीय उपचार घेण्यासाठी येत असतात अशावेळी श्री साईबाबा संस्थानाच्या साईबाबा सुपर हॉस्पिटल मध्ये कुठल्याही प्रकारचे पैसे भरण्यासाठी रोख स्वरूपात भरावे लागतात मात्र अशावेळी ज्याच्या कडे रोख रक्कम नाही ऑनलाईन पेमेंट असेल तर अशावेळी गुगल पे, फोन पे किंवा भीम असा कुठलाही क्यू यज्ञआर कोड कॅश काऊंटवर सुविधा नसल्याने मोठा त्रास रुग्ण व नातेवाईकांना सहन करावा लागतो त्यामुळे फोन पेवर सुध्दा पैसे स्विकारण्याची सुविधा त्वरित सुरू करा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दिगंबर कोते यांनी केली आहे. कोते म्हणाले की शिर्डी येथील हॉस्पिटलमध्ये बरेचसे  बाहेर गावचे व परराज्यातील रुग्ण येतात. त्यांच्याकडे रोख स्वरूपात पैसे उपलब्ध नसतात.

त्यामुळे त्यांना नाईलाजास्तव बाहेरून मनी ट्रान्स्फर यांच्याकडून दोन टक्के दराने जास्त  पैसे देऊन रोख स्वरूपात पैसे घ्यावे लागतात. असा रुग्णाचा



अनुभव आहे  काही खाजगी  एजंट. असे दोन टक्के दराने पैसे देण्यासाठी काऊंटरच्या  आसपास फिरत असतात त्यामुळे बाहेर गावावरून येणाऱ्या गोरगरीब रुग्णांची आर्थिक लूट होते व त्यांना मानसिक. शारीरिक. आर्थिक. त्रासात सामोरे जाणवे लागते तरी साईबाबा संस्थान शिर्डी यांनी सदर काउंटर व बिलिंग विभागामध्ये तसेच अपघात विभागामध्ये फोन पे अथवा गुगल पे यावर पैसे भरण्यासाठी ची ऑनलाइन क्यू आर कोड ची सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी दिगंबर कोते यांनी संस्थानकडे केली असता साईबाबा संस्थानने याबाबत सकारात्मक विचार करून लवकरच  येत्या काही दिवसांत प्रश्न मार्गी  लावू असे आश्वासन दिले आहे.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ प्रत्येक पात्र महिलेला मिळवून देण्यासाठी यंत्रणा गतिशील करा

## आ. किशोर जोरगेवार : विविध समस्यांना घेऊन महानगरपालिका प्रशासन सह बैठक, विविध सूचना

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** राज्य सरकारने सुरु केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेची महानगरपालिका क्षेत्रात उत्तमरीत्या अंमलबजावणी करण्यासाठी संपूर्ण यंत्रणा गतिशील कार्यान्वित करत प्रत्येक पात्र महिलेला योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करा, अशा सूचना आमदार किशोर जोरगेवार यांनी महानगरपालिका प्रशासनाला केल्या आहेत.

आज सोमवारी चंद्रपूर महानगरपालिकेत आमदार किशोर जोरगेवार यांनी बैठक बोलावली होती. सदर बैठकीत त्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली असून अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना केल्या आहेत. या बैठकीला मनपा अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त रविंद्र भेलावे, सहाय्य आयुक्त सचिन माकोडे, नरेंद्र बोबाटे, अमुल भुते, अमोल शडके, अमित घुले, शहर अभियंता विजय बोरिकर, रविंद्र हजारे, डॉ. नयना उत्तरवार, राहुल पंचबुध्दे, रविंद्र कांबळे, रफिक शेख, सारिखा शिरभाते, राहुल भोयर, आशिष भारती यांच्यासह माता महाकाली महोत्सव समितीच सचिव अजय जयस्वाल, महिला शहर प्रमुख वंदना हातगावकर, आदिवासी विभागाचे जिल्हा अध्यक्ष जितेश कुळमेथे, सविता दंडारे, सायली येरणे, अल्पसंख्याक शहर प्रमुख सलिम शेख, अल्पसंख्यांक युथ शहर प्रमुख राशेद हुसेन, युवती प्रमुख भाग्यश्री हांडे, अल्पसंख्याक महिला शहर प्रमूख कौसर खान, विमल कातकर, कल्पना शिंदे, अल्का मेश्राम, कविता निखाडे, अस्मिता दोनाडकर, शहर संघटक करणसिंग बैस, प्रसिद्धी प्रमुख नकुल वासमवार, हरमन जोसेफ, मंगेश अहिरकर, मुकेश गाडगे, राम जंगम, विनोद अनंतवार आदींची उपस्थिती होती. अनेक अधिकारी आणि नागरिकांची उपस्थिती होती.

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेबाबत महिलांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित करा, मनपाद्वारे सुरु करण्यात आलेल्या पाच केंद्रांबाबत जनजागृती करा, केंद्रावर येणाऱ्या महिलांची गैरसोय होणार नाही, या दृष्टिकोनातून या केंद्रांवर उपाययोजना करत अर्ज स्वीकारण्याची गती वाढवा, अशा सूचना आमदार किशोर जोरगेवार यांनी मनपा प्रशासनाला केल्या आहेत. अमृत 2.0 अंतर्गत प्रस्तावित कामे जलद गतीने करण्याच्या सूचनाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहेत. केरला कॉलनी येथील नाल्यामुळे या परिसरात पुरपरिस्थिती निर्माण होत असते. त्यामुळे सदर नाल्याची स्वच्छता करण्यात यावी, अशा सूचनाही सदर बैठकीत आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहेत. अमृत योजनेचे नळाचे देयके चुकीच्या पद्धतीने देण्यात आले आहेत. याची चौकशी करून देयके वसुलीची सक्ती करू नये, अशा सूचनाही आमदार किशोर जोरगेवार यांनी मनपा अधिकाऱ्यांना केल्या आहेत. जन्म दाखल्यासाठी येणाऱ्या नागरिकांना कर अदा केले असल्यास दाखला दिला जाईल, असा प्रकार सुरु आहे. हे योग्य नाही. दाखल्यासाठी येणाऱ्या सर्व नागरिकांना तात्काळ दाखला उपलब्ध करून देण्यात यावा, असे निर्देशही आमदार किशोर जोरगेवार यांनी मनपा प्रशासनाला दिले आहेत.

पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने शहरातील स्वच्छतेकडे अधिक लक्ष द्या. अनेक भागात नियमित स्वच्छता होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. मनपाच्या शाळांमध्ये सुविधा उपलब्ध करण्याला प्राधान्य देत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी योजनाबद्ध दृष्टिकोनातून सर्व विभागाशी समन्वय ठेवून काम करा, असे निर्देश आमदार किशोर जोरगेवार यांनी मनपा प्रशासनाला दिले आहेत. या बैठकीत आमदार जोरगेवार यांनी स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाविषयी विशेष चर्चा केली. कचरा संकलन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि कार्यक्षमतेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. नागरिकांना नियमित आणि स्वच्छ पाणीपुरवठा मिळण्यासाठी जलव्यवस्थापनाच्या उपाययोजना करण्याची गरज आमदार किशोर जोरगेवार यांनी यावेळी व्यक्त केली. शहरातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी महानगरपालिकेने विशेष उपाययोजना कराव्यात. शहराच्या विकास प्रक्रियेत स्थानिक नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. महानगरपालिकेने जनतेच्या समस्या आणि सूचना विचारात घ्याव्यात, असेही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांना सूचित केले आहे. यावेळी नागरिकांनी अनेक तक्रारी दिल्या. सदर तक्रारींची तत्काळ दखल घेण्याच्या सूचना आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहेत. सदर बैठकीला शहरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# मुखेड येथील जागृत देवस्थान वीरभद्र मंदिराचे काम रखडले

## संबंधित कामाची चौकशी करून लोकप्रतिनिधी सह दोषींवर कार्यवाहीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** नगर परिषद फंडातून व शासकीय फंडातून या पूर्वी



झालेले व होत असलेल्या विरभद्र मंदिरांच्या कामाची चौकशी करुन खाजगी क्षेत्रात नगर परिषदची मालकी नसलेल्या कामाची रक्कम संबंधिताकडून वसुल करुन दोषी व्यक्तीवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी मुखेड शहरातील करण्यात येणारे श्री वीरभद्र मंदिर बांधकामाच्या अनुषंगाने सदरील मंदिर जागे बाबत मुखेड न्यायालयात चालू असलेल्या वादाचा निर्णय होण्या आधी नगर पालिका प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या आट्टाहासामुळे सदरील जागा कोणाच्या मालकीची किंवा ट्रस्टची हा वाद निर्माण झालेला असून, यापूर्वी घेण्यात आलेल्या कामाची मंजुरीवर प्रश्न निर्माण झालेला असल्यामुळे सदरील काम करणे उचित व न्यायावह राहणार नाही. माहिती मागीतली असता, मुदतीत सा.बां. विभागाने माहिती देण्यास टाळाटाळ करीत असून, माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकार 2005 अपिल करण्यात आले आहे. माहिती अधिकार अर्जानुसार माहिती न देण्यासाठी लोकप्रतिनिधी तुषार राठोड यांच्याकडून दबाव असल्याचे कळते या वरुन सदरील काम मंजुरीसाठी मंदिराच्या जागे बाबत खोटे कागद पत्र तयार केले आहे म्हणून माहिती जाणिवपुर्वक लपवली जात आहे. शेत सर्वे नंबर 46,47,48 मध्ये रस्ता व नाली (गटारी) काम मंजुरीसाठी मा. जिल्हाधिकारी नांदेड यांना सदरील जागा ही नगर परिषद मालकी असून ताब्यात असलेले खोटे प्रमाणपत्र देऊन सदरील कामास मंजुरी घेण्यात आली आहे. सदरील जागा मालक यांच्यावर भंग केल्यामुळे जवळपास 1 ते 1.5 कोटी दंडाचा प्रस्ताव उपजिल्हाधिकारी देगलूर यांच्या कडे सादर असताना देखील बनावट कागदपत्र सादर करुन कामाची मंजुरी घेऊन कामे पूर्ण करण्यात आली आहेत. अर्जाची चौकशी करुन दोषी अधिकारी यांच्या कडून झालेला खर्च वसुल करुन खोटे प्रमाणपत्र देऊन जिल्हाधिकारी व शासनाची फसवणुक केल्या प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करावे किंवा प्रचलित नियमानुसार शासकीय कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यास परवानगी देण्यात यावी. अशी मागणी होताना दिसुन येत आहे.

# हॅपी मोमेंट्सतर्फे गरीब विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप : एक छत्री दान कार्यक्रम उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** बीड बायपास परिसरात आजही अनेक मुलं-मुली शिक्षणापासून वंचित आहेत. या झोपडट्टीतील गरीब मुलांना पावसाळ्यात पावसापासून संरक्षण मिळावे आणि त्यांनी रोज शाळेत जावे या हेतून "एक छत्री दान " या कार्यक्रमाचे आयोजन हॅपी मुमेंट्स संस्थेतर्फे बीड बायपास येथे रविवारी सकाळी करण्यात आले होते. जवळपास ५० हून अधिक मुलामुलींना या कार्यक्रमाअंतर्गत छत्र्यांचे वाटप करण्यात आले. हॅप्पीमुमेंट्स च्या अध्यक्षा बेरील सांचीस यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते . शिक्षणातील अडचणी दूर करून त्यांना शिक्षण मिळावे या हेतूने ही संस्था गेली काही वर्ष काम करत आहे. नितीन मुगडीया, श्रीनिवास धुप्पड, नंदलाल फुलवाणी , शंतनू पुराणिक, आनंद बन्सल अग्रवाल, आयुष अग्रवाल , रेजिना रॉड्रिग्स आणि इतर देणगीदार यांनी सढळ हाताने मदत करत झोपडपट्टीतील मुलांना छत्र्या दान केल्या. या कार्यक्रमामुळे मुलांना शाळेत जाण्यासाठी प्रोत्साहन तर मिळाले पण एका छत्रीमुळे त्यांना एक ऊर्जा आणि समाधान मिळाल्याचे त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. यावेळी बेरील सांचीस म्हणाल्या , छत्रपती संभाजीनगर येथे आजही अनेक गरीब मुलं शिक्षणापासून वंचित आहेत . झोपडपट्टीत राहून हलाखीच्या परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण घेणं शक्य होत नाही . त्यांना किमान शिक्षण मिळावं आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणून स्वकर्तृत्वावर मोठे व्हावे यासाठी हॅपी मुमेंट्स ही संस्था काम करते. बीड बायपास येथे झोपडपट्टीत राहणाऱ्या मुलांचं पुर्नवसन करण्याचा प्रयत्न हॅपी मुमेंट्सच्या अध्यक्षा बेरील सांचीस करत आहेत.

हॅपी मुमेंट्स संस्था गरजू, गरीब मुलां मुलींसाठी शिक्षण तसेच स्त्रियांना सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेत असते . समाजातील अनेक दानशूर हात समोर आले तर आपण गरजू आणि होतकरू लहान मुलांना चांगले शिक्षण देऊन एक सक्षम भविष्य उभ करू शकतो . मदत करण्यासाठी ९९६०६६९९०४ या क्रमांकावर संपर्क करायचे आवाहन हॅप्पीमुमेंट्स च्या अध्यक्षा बेरील सांचीस यांनी केले आहे .

# रायगडाला पावसाचा तडाखा; अनेक ठिकाणी पूरसदृश परिस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**अलिबाग :** रविवारी रात्री झालेल्या पावसाचा रायगडला तडाखा बसला आहे. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील अनेक भागात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. नद्यांच्या पाणी पातळीतही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी अलिबाग आणि मुरूड तालुक्यातील शाळा आणि महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर केली आहे. शनिवार पाठोपाठ रविवारीही रायगड जिल्ह्यात पावसाचे रौद्र रूप पहायला मिळाले. शनिवारी कर्जत, खोपोली, पनवेल, सुधागड, रोहा तालुक्यांना पावसाचा तडाखा बसला होता. रविवारी महाड, पोलादपूर, अलिबाग, श्रीवर्धनमध्ये अतिजोरदार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे ठिकठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. अलिबाग तालुक्यात रविवारी रात्री साडेअकरानंतर विजांच्या कडकडाटासह पावासाला सुरूवात झाली, पहाटे तीन वाजेपर्यंत तुफान पाऊस सुरू होता. त्यामुळे अलिबाग शहरासह, चेंढरे, नेऊली, खंडाळे परिसर जलमय झाले होते. मध्यरात्री अनेक घरांमधे पावसाचे पाणी शिरले होते. त्यामुळे रहिवाश्यांची तारांबळ उडाली होती. घरातील सामानाला सुरक्षित ठेवण्यासाठी धावपळ सुरू होती. अलिबाग तालुक्यात रामराज, चरी, सारळ, किहीम, चौल, पोयनाड परिमंडळात अतिवृष्टी झाली. जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सावित्री, कुंडलिका, अंबा, पाताळगंगा, उल्हास आणि गाढी नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली होती. कुंडलिका नदीने शनिवारी रात्री दहा वाजता इशारा पातळी ओलांडली होती. त्यामुळे नदी किनाऱ्यांवरील गावांना सतर्क राहण्यास सांगण्यात आले होते. दरम्यान अलिबाग आणि मुरुड तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली. पण हे आदेश येण्यास उशीर झाल्याने सकाळच्या सत्रातील शाळा नियमित सुरू होत्या.

तळा २८७, म्हसळा २७३, मुरुड २५५, अलिबाग १७०, श्रीवर्धन १३१, माणगाव ९२, रोहा ९३, पनवेल ९० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात सोमवारी सकाळी आठ वाजेपर्यंत संपलेल्या २४ तासात सरासरी १०८ मिमी पावसाची नोंद झाली आहे.



# आठवड्याभरापासून उघडीप; मोठ्या पावसाची प्रतीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**बाजारसावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये ठिकठिकाणी खरिप पिक माल लई भारी आले असुण गत आठवड्याभरापासुन पावसाने उघडीप दिल्याने शेतकऱ्यांनी पिक अंतर्गत मशागत कामे आटोपते घेतले असुण मोठ्या पावसाची प्रतिक्षा शेतकऱ्यांना आहे. यंदा वेळेवर पावसाळा सुरू होऊन रोहीणी मृग आर्द्रा नक्षत्र संपले यात मृगाचे सात आठ पाऊस झाले तर आर्द्रा नक्षत्राची तिच अवस्था राहीली तर यात पुनर्वसु नक्षत्र काही फटकेबाजी करेना कधि रिमझिम कधि निव्वळ ढगाळ वातावरण.असे वाटते जोराचा व मोठा पाऊस होईल मात्र पोकळ ढगाळ इकडून तिकडे वाहत आहे. खरिप पिके हिरवीगार टवटवीत फडफडु लागली आहे. पिकांची जोरदार जोमदार वाढ होत आहे. पावसाळा सुरु होवुन महिना झाला मात्र ओढे नदी नाले तलाव विहिरींना अद्याप पुर पाणी नाही. फक्त खरिप पिकांच्या साठी पाऊस झाला आहे. आता जोरदार पाऊस झाला तर ओढे नदी नाले तलाव विहिरी यांना पुर पाणी येण्याची शक्यता आहे.कारण महिन्याभरात फक्त माल पिका साठीचा पाऊस झाला आता मात्र वाहता होईल, अशी आशा आहे. खरिप पिके कापुस मका तुर सोयाबीन बाजरी ज्वारी बाजरी मुग उडीद सर्व खरिप पिके आता पर्यंत हिरवीगार टवटवीत निरोगी आहे. त्यात आठवडाभराची ओढ उघडीप पावसाने दिल्याने काही शेतकऱ्यांनी उपलब्ध पाणी साठ्यातुन पिकांना पाणी देने सुरु केले आहे. पावसाच्या उघडीप मुळे शेतकऱ्यांनी सद्या पिक अंतर्गत मशागत तथा निंदणी खुरपणी डावरा मारणे, कोळपणी करणे वखर मारणे आदि पिक अंतर्गत मशागत कामे हाती घेतले आहे. पिकांची जोमदार वाढ झाल्याने पिकांना मोठ्या पावसाची गरज आहे. शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहे.



# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेपासून कोणीही वंचित राहणार नाही : मुनगंटीवार

## लाडक्या बहिणीला लाभ देण्यासाठी कटिबद्ध

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्यातील महिलांचे आर्थिक स्वातंत्र, त्यांचे आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे, तसेच कुटुंबातील त्यांची निर्णायक भुमिका मजबूत करण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजना' सुरू केली आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिला व मुलींना दरमहा 1500 रुपये देण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यातील अर्ज भरण्याची मुदत 31 ऑगस्ट 2024 पर्यंत असली तरी त्यानंतरसुध्दा ही योजना सुरू राहणार आहे. शेवटच्या लाडक्या बहिणीपर्यंत या योजनेचा लाभ पोहचविण्यासाठी शासन कटिबध्द असून कोणीही यापासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.



नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात, महिलांसाठी तसेच इतर योजनांचा जिल्ह्यातील प्रगतीचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, अपर पोलिस अधीक्षक रिना जनबंधू, महानगर पालिका आयुक्त विपीन पालीवाल, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत, सामाजिक न्याय विभागाचे सहायक आयुक्त बाबासाहेब देशमुख, डॉ. मंगेश गुलवाडे, देवराव भोंगळे, नरेंद्र जीवतोडे, श्री. रमेश राजुरकर आदी उपस्थित होते. 'मुख्यमंत्री : माझी लाडकी बहीण योजने' चा लाभ मिळवून देण्यात चंद्रपूर जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर असला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, जिल्ह्यातील जवळपास 7 लक्ष पात्र लाभार्थ्यांना आपण या योजनेचा लाभ मिळवून देऊ शकतो. त्यासाठी प्रशासनासोबतच सर्व सामाजिक संघटना, पदाधिकारी व नागरिकांनी प्रयत्न करावे. जास्तीत जास्त लाडक्या बहिणींना या योजनेंतर्गत दरमहा 1500 रुपये मिळण्यासाठी राज्य शासनाने अनेक अटी शिथील केल्या आहेत. तरीसुध्दा विनाकारण गर्दी वाढत आहे. ही योजना 31 ऑगस्ट 2024 नंतरही सुरू राहणार आहे, याची लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी.

या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांचे बँक खाते असणे अनिवार्य आहे, कारण दरमहा थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने 46 हजार कोटींची तरतूद केली आहे.

शासनाने निःशुल्क सुरू केलेल्या कोणत्याही योजनेसाठी पैसे आकारण्यात येत असेल तर संबंधितांविरुध्द त्वरीत गुन्हा नोंद करावा. तसेच बनावट नावाने योजना सुरू असल्याचे आढळल्यास जिल्हा प्रशासनाने त्यावर कडक कारवाई करावी. एवढेच नव्हे तर जो विभाग, किंवा अर्ज भरून घेणारे केंद्र लाभार्थ्यांना त्रास देत असेल तर त्यांच्यावरसुध्दा कडक कारवाई करा, असे निर्देश पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनाला दिले.

मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेबाबत बोलतांना पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, या योजनेंतर्गत तीन गॅस सिलिंडर मोफत देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील कोणतेही पात्र कुटुंब या योजनेपासून वंचित रहाता कामा नये. शेतीविषयक योजना जलदगतीने शेतक-यांपर्यंत पोहचण्यासाठी प्रत्येक तालुका स्तरावर तसेच जिल्हा स्तरावर डाटा एन्ट्री ऑपरेटरची लवकरात लवकर नियुक्ती करण्यात येणार आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच ओबीसी प्रवर्गातील मुलींच्या व्यवसायीक शिक्षणासाठी शासनाने 1900 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पदवी व पदविकाधारक विद्यार्थ्यांसाठी दरमहा 10 हजार रुपये देण्यात येणार आहे. पैसे सरकार देणार, कौशल्य उद्योगांनी द्यावे, यासाठी शासनाने 10 हजार कोटींची योजना सुरू केली आहे. वयोश्री योजनेतही चंद्रपूर जिल्ह्याला पुढे न्यायचे आहे, असेही पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. बैठकीला विविध विभागाचे अधिकारी तसेच पदाधिकारी आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# शेंदुर्णी शहरात घाणीचे साम्राज्य

## नगर पंचायतचा भोंगळ कारभार

आधुनिक केसरी न्यूज




**शेंदुर्णी :** शहरांमध्ये नगरपंचायत च्या माध्यमातून स्वच्छतेचे कामकाज फक्त कागदो पत्री दाखवले जात असल्याने घाणीचे साम्राज्य शहरात वाढलेल आहे त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव झालेला आहे. सध्या पावसाळी वातावरण असल्या कारणाने नागरिकांना या घाणीच्या त्रासामुळेआरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले आहे त्यामुळे दवाखान्यां मध्ये गर्दी वाढताना दिसत आहे. वाडी दरवाजा भागातील सोयगाव रोडवरील पाण्याच्या टाकी पासून परिसरात बांधलेल्या गटारी मध्ये बांधकामाचे मटेरियल जसेच्यातसे असून, गटार जास्त प्रमाणात वाहते पाणी बंद झालेले असून गटार बांधकामाचे साहित्यही त्यामध्ये साफ केलेले नाही परिणामी बांधणीचे मटेरियल खाली पडलेले असल्याने पाणी तुंबून राहते त्यामुळे डासांची उत्पत्ती जास्त प्रमाणात झालेली आहे. लहान मुले व वृद्धांना खूपच याचा त्रास होऊन मलेरिया डेंगूसारखे व्हायरल आजारांनी ग्रस्त झालेले दिसत आहे. मुख्याधिकारी नगरपंचायत तर्फे दरमहा 15 ते 20 लाख रुपये कॉन्ट्रॅक्टदारामार्फत स्वच्छतेचे बिल मात्र वेळेवर अदा केले जाते. शहरात फिरणाऱ्या घंटा गाड्या ह्या नादुरुस्त झाल्या असून त्या फक्त तुरळक भागातच कचरा संकलनाचे काम करत असतात, मात्र काही भागांमध्ये घंटागाड्या कचरा जमा करण्यासाठी ही येत नसून शहरातील चौकात चौकामध्ये कचऱ्याचे ढीग वाढलेले दिसत आहे. नगरपंचायत मुख्याधिकारी यांना याचे कोणतेही सोयर सुतक नसून ठेकेदाराचे बिल काढण्यासाठी ची तत्परता जेवढी दाखवतात तेवढे शहरातील कचरा उचलण्यासाठी ही ठेकेदारास सांगावे,अशी सूचना नागरिकांकडून होताना दिसत आहे. शहराच्या प्रत्येक भागामध्ये औषध फवारणी होणे गरजेचे असून तात्काळ त्यावर अंमलबजावणी करावी अन्यथा शहरांमध्ये मलेरिया डेंगू सारखे आजार उद्भवण्याची दाट शक्यता आहे. लवकरात लवकर शहरातील गटार.नाला. व रस्ते सफाई नाही झाली तर आंदोलनाचा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे शहर प्रमुख संजय सूर्यवंशी यांनी दिला आहे.

# 'कष्टाच्या वाटा'ला झेना बाल कथासंग्रह पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** धुळे-देवपूर येथील झेना काव्यगौरव विकास परीषदेच्या वतीने 2024 चा अत्यंत मानाचा दिला जाणारा राज्यस्तरीय बाल साहित्य पुरस्कार यंदा प्रसिद्ध बाल साहित्यिक तथा ग्रामीण लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांच्या " कष्टाच्या वाटा " या दर्जेदार व आशयघन बाल कथासंग्रहाला जाहीर झाले आहे. असे धुळे-देवपूर येथील झेना काव्यगौरव विकास परीषद समितीने अय्युब पठाण लोहगांवकर यांना नुकतेच कळविले आहे. या पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल श्रीफळ असे असून लवकरच मान्यवरांच्या हस्ते झेना बाल कथासंग्रह पुरस्कार धुळे-देवपूरच्या चंदननगर येथे श्री. अय्युब पठाण यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. श्री. पठाण यांच्या या यशा बद्दल साहित्य क्षेत्रातील साहित्यिकांनी आणि मित्रमंडळी यांनी श्री. पठाण यांना शुभेच्छा देऊन त्यांचे स्वागत केले आहे.





# बॉम्ब फेकून दुकान जाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक करा

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** वस्ती विभागातील मोतीलाल प्रभुलाल मालू कपड्याचे दुकान जाळण्याचे प्रयत्न करणाऱ्या आरोपींना तत्काळ पकडण्याची मागणी पोलीस अधीक्षक यांना निवेदन देऊन केल्याची मालू परिवार व व्यापारी मंडळानी ने पत्रकार परिषदेत केली. ७ जुलै ला सकाळी १०.४० वाजताच्या सुमारास मालू बंधू यांचा दुकानावर पेट्रोल बॉम्ब सदृश्य सारखे बॉम्ब फेकले होते तसेच नोकर ला हत्याराने मारण्याचे प्रयत्न केले होते. त्यांचा हातात बंदूक दिसली होती. जर दुकान मालक पळून गेले नसते तर त्यांचावर हल्ला करून ठार मारण्याचे इरादा आरोपीचा होता. तसेच त्यांचा संशय सुरज गुप्ता, निरज गुप्ता व परिवार असून त्यांना तत्काळ अटक करण्याची मागणी केली. मागील दीड वर्ष अगोदर सुरज गुप्ता यांनी त्यांचे दुकान जाळले होते. त्याचा वर गुन्हा दाखल असून आता पर्यंत पोलीसांनी त्याला अटक केले नाही. सूरज गुप्ता हा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या असून तेच कट रचत असल्याचा आरोप केले गेले. मागील महिन्यात याच दुकानाचे मालक अभिषेक मालू रात्री आपले दुकान बंद करून घरी जात असताना त्यांच्यावर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केले होते. तेव्हा सुद्धा पोलीस स्टेशन येथे तक्रार केली होती पण पोलीसांनी दुर्लक्ष केले. त्यामुळेच आजची घटना घडली असून आरोपींना तत्काळ अटक नाही केल्यास तीव्र आंदोलन व बेमुदत दुकाने बंद करण्याचा इशारा पत्रकार परिषदेत दिला. अभिषेक मालू यांचा घरी ११ जुलै ला विवाह असून बाहेरील गावचे पाहुणे मंडळी आले आहेत. त्यांचा परिवाराकडून राम मंदिरात कार्यक्रम आयोजित केले होते. सूरज गुप्ता व निरज गुप्ता हे मालू परिवार वर द्वेष भावनेतून हल्ला करण्याचा प्रयत्न करत आहे. मालू परिवार पूर्णपणे दहशतीचा वातावरणात असून पोलीस विभागांनी त्यांना सुरक्षा देण्याची व २४ तास गांधी चौकात पोलीस तैनात करण्याची मागणी केली आहे. पत्रकार परिषदेत व्यापारी मंडळ चे इब्राहिम जव्हेरी, रामधन सोमाणी, गोपाल खंडेलवाल, राजु मुंधळा, राकेश सोमाणी व दुकानाचे मालक अभिषेक मालू, सुनील मालू, सुरेश मालू उपस्थित होते.
दरम्यान पोलिसांनी गोळीबार चा नकार दिला आहे. तसेच गुप्ता यांचा परिवारातील सदस्यांना ताब्यात घेऊन कसून चौकशी सुरू केली आहे. घटनास्थळी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस



अधीक्षक रिना जनबंधू, उपविभागीय पोलिस अधिकारी दिपक साखरे, राजुरा चे ठाणेदार योगेश्वर पारधी यांनी भेट दिली. पुढील तपास पोलीस निरीक्षक आसिफराजा बी शेख करीत आहे.



# जिल्हा परिषद डहाळेगाव शाळेने राबवला सीडबॉलचा उपक्रम


आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डहाळेगाव मध्ये यावर्षी विद्यार्थ्यांनी व शाळा व्यवस्थापनाने सीडबॉलच्या माध्यमातून वृक्ष निर्मिती आणि संवर्धनाचा उपक्रम राबविण्याचे ठरविले व त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आली. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विद्यार्थ्यांनी विविध वृक्षांच्या जसे गुलमोहर, बहावा, चिंच, कडुनिंब, आंबा, करंजी, शेवगा, पिकोमा इ. वृक्षांच्या बिया संग्रहित करण्यात आल्या. त्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक श्री. संदीप घालमे व सहशिक्षक श्री. भागवत गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना सीडबॉल बनविण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. विद्यार्थ्यांनी जवळजवळ 500 ते 550 सीडबॉल तयार केले. सीडबॉल ची निर्मिती करताना विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह आणि आनंद दिसून आला.
प्रत्येक विद्यार्थ्याने दहा ते पंधरा सीडबॉल तयार केले. दुसऱ्या दिवशी शाळेच्या परिसरामध्ये सर्व सीडबॉलचे रोपण करण्यात आले. सीडबॉलच्या माध्यमातून वृक्ष निर्मिती करण्यामुळे पर्यावरणाविषयी जागृती आणि पर्यावरण संवर्धन या गोष्टी मुलांमध्ये रूजवण्यास मदत होणार आहे. बियांपासून वृक्षांची निर्मिती कशी होते? बियांमधून अंकुर फुटल्यानंतर प्रत्येक वृक्ष एकमेकांपासून कसा वेगळा आहे? प्रत्येक वृक्षांमध्ये मोठे होत जात असताना होणारे बदल, अंकुर बाहेर आल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणारा आनंद, वृक्ष मोठे होण्यासाठी घ्यावी लागणारी काळजी, या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांना शाळा परिसरामध्येच अनुभवता येणार आहेत. याशिवाय स्वतः लावलेल्या बियांपासून उगवणाऱ्या वृक्षांविषयी काळजी घेत असताना विद्यार्थ्यांमध्ये निश्चितच जवळीकता आणि आपुलकी निर्माण होवून वृक्ष संवर्धनासाठी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा निर्माण होणार आहे. या उपक्रमामध्ये शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष. श्री धोंडीराम थोरात, उपाध्यक्ष श्री. हनुमान जाधव. व समितीचे सदस्य श्री. ज्ञानेश्वर मुके, गजानन मुके, ऋषिकेश मुके, वैजीनाथ राऊत, पूजा नवनाथ मुके, सोनी महादेव जाधव, शीला गजानन मुके, नवनाथ जाधव, दत्तात्रय मुके इ. नी सहाय्य केले.

# पक्षाने संधी दिल्यास मुखेड कंधार विधानसभा लढवणार : डॉ. रॅपनवाड

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** कंधार विधानसभा मतदारसंघाचा पुढील आमदार



महाविकास आघाडीचाच होईल असा विश्वास व्यक्त करीत पक्षाने संधी दिल्यास विधानसभा निवडणूक लढण्याचे काँग्रेस प्रदेश सचिव भारतयात्री डॉ. श्रावण रॅपनवाड यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.
प्रदेश काँग्रेस कमिटी कडून प्रत्येक मतदारसंघातून इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागवण्यास प्रारंभ झाला आहे त्या पार्श्वभूमीवर आज (रविवार)मुखेड येथे विश्रामगृहात पत्रकार परिषद घेऊन काँग्रेस सचिव डॉ. श्रावण रॅपणवाड यांनी ही माहिती दिली. प्रत्येक मतदारसंघातून जिल्हाध्यक्षांकडे सदर उमेदवारी अर्ज भरून रुपये वीस हजार पक्षनिधी म्हणून रोख किंवा प्रदेश काँग्रेसच्या नावे डीडी काढून द्यावयाचे आहेत. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना रॅपणवाड यांनी सांगितले की पक्षाकडे मीही उमेदवारी मागत असून मला संधी दिल्यास विजयी होण्याचा आत्मविश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. महाविकास आघाडीच्या वाटाघाटीत हा मतदारसंघ मित्रपक्षास गेल्यास महाविकास आघाडीचा प्रामाणिक प्रचार करून उमेदवार विजयी करण्याचा मानस त्यांनी बोलून दाखविला.

# मनोज जरांगे महारॅलीसाठी खुलताबाद तालुक्यात जि.प. गटनिहाय बैठका

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** छत्रपती संभाजीनगर येथे संघर्ष मराठा योध्दा मनोज दादा जरांगे यांची दि. १३ जुलै रोजी महारॅली चे आयोजन करण्यात आले असल्याने खुलताबाद तालुक्यात जिल्हा परिषद गटनिहाय सखल मराठा समाज खुलताबाद च्या ठिकठिकाणी मोर्चा बांधणी साठी बैठका घेण्यात आल्या. तालुक्यातील बाजार सावंगी सह ठिकठिकाणी गावा गावात सखल मराठा समाजाच्या वतीने महारॅली तथा मराठा



आरक्षणला घेवून चर्चा नियोजन करण्यात आले. वरिष्ठाकडून आलेल्या सुचना आदेशाप्रमाणेच महारॅलीत उपस्थित रहाणाऱ्या सखल मराठा समाजाने शिस्त प्रिय प्रमाणे वागावे येणाऱ्या जाणाऱ्याचे नियोजन आदीवर चर्चा करण्यात आली.

# मुख्यमंत्री बहीण माझी लाडकी योजनेचा लाभार्थींनी नोंदणी सेवेचा लाभ घेतला

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुलआबेद्दीन**

**मेहकर :** राजमाता जिजाऊ सामाजिक फाउंडेशन व डोणगाव अर्बन परिवाराच्या संयुक्त विद्यमानाने मुख्यमंत्री बहीण माझी लाडकी या योजनेसाठी ५ टेबल लावत मोफत निशुल्क मार्गदर्शन व योजनेबाबतचे संपूर्ण अर्ज भरणे व मार्गदर्शन करणे व लाभार्थ्यांना सदर योजनेसाठी मोफत अर्ज व त्याची संपुर्ण प्रक्रिया करून देण्यासाठी आज निशुल्क शिबिर घाटबोरी येथे आयोजित केले होते. सामाजिक जाणीव म्हणून राजमाता जिजाऊ सामाजिक फाउंडेशन व डोणगाव अर्बन यांच्या संयुक्त विद्यमाने आज शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी कार्यक्रमाला डोणगाव अर्बन बँकेचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण हे अध्यक्ष म्हणुन लाभले होते व प्रमुख उपस्थितीमध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ.श्री ज्ञानेश्वर टाले तसेच घाटबोरी येथिल सरपंच राजूभाऊ पाखरे ,रामेश्वर खोडके,बाळु डोंगरे,सचिन जाधव,अंकुश राठोड,राजू कुसळकर ,ज्ञानेश्वर दांडदे , शंकर गिरी ,भास्कर पाटील चोपडे,संदीप बोंदार्डे ,गावामधिल



काही नवयुकांनी,स्वयसेवक यांनी सर्व पाञ महिला भगिनींनी या योजनेचा लाभ मिळावा म्हणुन पुढाकार घेतला व सहकार्य केले.सदर योजनेतुन लाभ घेण्यासाठी संपूर्णपणे निशुल्क व मोफत सहकार्य करण्यासाठी घाटबोरी जि.प.शाळा या ठिकाणी राजमाता जिजाऊ फाउंडेशन आणि डोणगांव अर्बन च्या वतीने संपुर्ण सहकार्य करण्यात आले. घाटबोरी येथिल परिसरातील शेकडो महिला भगिनींनी या निशुल्क शिबीराचा लाभ घेतला.महिलांनी हे अजुन चार दिवस चालु ठेवावे असी विनंती केली.त्यामुळे शेवटच्या सर्व पाञ महिला भगिनीचा अर्ज भरुन घेईपर्यत हे शिबीर चालु ठेऊ असा शब्द ऋषांक चव्हाण यांनी दिला.



# आ.फारुख शाह यांच्या हस्ते वडजाई सौंदाणे रस्त्याचे डांबरीकरण कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे लेखाशीर्ष 50 54 /४ मार्ग व पूल अंतर्गत धुळे वडजाई सौंदाणे बाबुळवाडी रस्ता रुंदीकरण डांबरीकरण करणे या कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या हस्ते संपन्न झाला. धुळे शहरातील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला वडजाई रोड व्हावा म्हणून सौंदाणे बाबुळवाडी वडजाई व धुळे शहरातील नागरिकांची मागणी होती या रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुर्दशा झालेली होती यावर पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणे साचत होते या रस्त्यावर बाबुळवाडी सौंदाणे वडजाई गावातील व शहरातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात रहदारी असून गावातील लोक शहरात येताना फार त्रास सहन करावा लागत होता या रस्त्यावर मोठमोठे खड्डे असल्यामुळे अनेक समस्यांच्या सामना या भागातील नागरिकांना करावा लागत होता यासाठी नागरिकांनी आ.फारुख शाह यांच्याकडे हा रस्ता व्हावा म्हणून पाठपुरावा केलेला होता. त्याची त्वरित दखल घेत आ.फारुख शाह यांनी वडजाई सौंदाणे बाबुळवाडी ते धुळे शहर पर्यंत हा रस्ता मंजूर करून आणलेला होता व त्याचे शुभारंभ आ.फारुख शाह यांचे हस्ते करण्यात आले यावेळी आ.फारुख शाह यांचे सोबत डॉ. दिपश्री नाईक,अनिस शाह,डॉ.शराफत अली, प्यारेलाल पिंजारी,इकबाल शाह, डॉ.बापुराव पवार, इब्राहीम पठाण, हारुण खाटीक, आसिफ शाह, गफ्फार शेख, रियाज शाह,हलीम शमसुद्दिन, सउद आलम, इद्रिस शेख, माजीद मिर्झा,रिझवान शाह, नजर पठाण, सलमान खान, हाशिम अन्सारी सा.बांधकाम विभाग उप अभियंता धर्मेंद्र झाल्टे, कनिष्ठ अभियंता विकास लोकरे,कामाचे ठेकेदार बी.एस. पाटील,समीर शाह व या भागातील परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणे उपस्थित होते तसेच एमआयएम पक्षाचे कार्यकर्ते नगरसेवक पदाधिकारी उपस्थित होते.

# बनावट राजीनामा तयार करून महिला सरपंचाची फसवणूक

## मक्रणपूर ग्रामपंचायतमध्ये गजब कारभार खोट्या सहया करून सरपंचाचा पदभार केला मुक्त


आधुनिक केसरी न्यूज

**गोरख पाटील**

**कन्नड :** तालुक्यातील मक्रणपूर येथील भुवया उंचवणारा प्रकार समोर येत आहे मक्रणपुर ग्रामपंचायतच्या सरपंच सना कौसर असलम शेख मेडीकल रजा असतांनी त्या कार्यकाळात माझ्या राजीनामा वर खोटया सहया करून माझी व शासनाची फसवणुक केली असून चौकशी करून गुन्हा दाखल करण्याचे निवेदन विभागीय आयुक्त, जिल्हा अधिकारी, निवडणुक निर्णय अधिकारी, गटविकास अधिकारी यांना देण्यात आले आहे . सना कौसर असलम शेख या 2021 च्या निवडणुक मध्ये ओबीसी महीला म्हणुन निवडणुन आल्या व त्या सरपंच या पदवार विराजमान झाल्या सर्व काही सुरळीत होते मात्र त्यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांनी ग्रामपंचायत लेटर पॅड वर आजारी असल्याची दि .30/6/2023 रोजी रजेचा अर्ज ग्राम संसद कार्यलय सचिव यांच्या कडे देखील दिला आहे.




मात्र त्याच कार्यकाळात माझ्या पश्चात माझ्या नावाची खोटी सही करून माझा बनावट सदस्य पदाचा राजीनामा वरीष्ट अधिकाऱ्याकडे पाठवुन माझी फसवणुक केली आहे. मि महिला सरपंच असल्याने माझी फसवणुक केली आहे सदरील राजीनामा मी प्रत्यक्षात कुठेच दिला नाही व कुठल्याही सक्षम अधिकारी तसेच कुठल्या ही व्हीडीओ रेकॉडीग किव्हा सी. सी. टी.व्ही. कॅमेरेत मी राजीनामा दिलेला नाही तसेच मक्रणपुर येथे राजीनामा दिल्याची पडताळणी केली असता मला व आम्हाला ग्रामपंचायत किव्हा पंचायत समिती तर्फे कुठलेच पत्र मिळाले नाही हे सर्व कारस्थान परस्पर करून मला हेतु पुरस्कर माझ्या पदावरून पाय उतार केल्याने सर सरळ माझी फसवणुक करून महीला पदाचा अपमान केला ही बाब माझ्या व कुटुंबीयाच्या लक्षात येताच मी लागलीच मा . विभागीय आयुक्त, मा . जिल्हा अधिकारी, निवडणुक निर्णय अधिकारी, गटविकास अधिकारी यांना निवेदन दिले आहे हया जागेची निवडणुकीला स्तगीती दयावी व महिलाला न्याय



दयावा असे निवेदन दि . 28/6/2024 रोजी जिल्हा अधिकारी तसेच इत्यादी कार्यालयात देण्यात आल्या आहे.

तसेच माझ्या खोट्या



सहया करून माझी व शासनाची फसवणुक केली म्हणुन कसुन चौकशी करून पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करून माझे पद मला प्रदान करावे असे निवेदनात म्हणटले आहे. यात आता जिल्हा अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना फेर चौकशीचे आदेश दिले आहे आता जिल्हा अधिकारी व निवडणुक अधिकारी काय भुमिका घेतात या कडे सर्वाचे लक्ष लागले आहे.




# नगरच्या मातीतला 'रांगडा' १२ जुलैला चित्रपटगृहात

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** महाराष्ट्राच्या मातीतली अस्सल कुस्ती व बैलगाडा शर्यत केंद्रस्थानी असलेला 'रांगडा' हा चित्रपट १२ जुलै रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार असल्याची माहिती या चित्रपटाचे निर्माते अमोल गव्हाणे व अभिनेते अमोल लंके यांनी दिली.

प्रेमकथा, राजकारण व ॲक्शन असलेल्या या चित्रपटाविषयी प्रेक्षका मध्ये प्रचंड उत्सुकता आहे. शेतकरी पुत्र प्रॉडक्शन या निर्मिती संस्थेच्या माध्यमातून योगेश बालवडकर, किरण फाटे, राहुल गव्हाणे, मच्छिन्द्र लंके, अब्बास मुजावर, आयुब हवालदार यांनी "रांगडा" या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाच्या निर्मितीसह कथा आणि दिग्दर्शन अशी कामगिरी आयुब हवालदार यांनी केली असून बाबाजी सातपुते आणि युवराज पठारे यांनी सहनिर्मिती केली आहे. संवादलेखक म्हणून दीपक ढुबे यांनी काम पाहिले आहे. अजित मांदळे, नौशाद इनामदार यांनी संकलन तर अन्सार खान यांनी छायाचित्रण केले आहे. अरुण वाळूंज, प्रमोद अंबाडकर यांनी लिहिलेल्या गीतांना रोहित नागभिडे यांचे सुमधुर संगीत




लाभले आहे. भूषण शिवतारे, मयुरी नव्हाते, अमोल लंके, भीमराज धनापुणे, अतिक मुजावर, संदीप (बापु) रासकर, राजेंद्र गुंजाळ, पल्लवी चव्हाण, निकिता पेठकर, निलेश कवाद या कलाकारांच्या दमदार प्रमुख भूमिका आपल्याला चित्रपटात पहायला मिळणार आहेत. विशेष म्हणजे, दोन राष्ट्रीय कुस्तीपटू चित्रपटातील महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. सर्वसामान्य कुटुंबातील तरुणाला कुस्ती आणि बैलगाडा शर्यतीचा असलेला छंद, त्यासाठी त्याला करावा लागणारा संघर्ष हे रांगडा चित्रपटाचं मुख्य कथासूत्र आहे. त्याशिवाय तगडे, बलदंड नायक, खलनायक, देखणी नायिका असल्यानं प्रेमकथा, राजकारण, तुफान ॲक्शनचा धडाकेबाज तडका या चित्रपटात आहे. ग्रामीण पार्श्वभूमीवरचं कथानक आजवर अनेक चित्रपटांमधून रुपेरी पडद्यावर आलं असलं, तरी त्यात रांगडा हा चित्रपट नक्कीच वेगळा ठरणार आहे. या चित्रपटाच्या सकस कथानकाची मांडणी तांत्रिकदृष्ट्या तितक्याच उत्तम पद्धतीनं करण्यात आल्याचं ट्रेलरवरून दिसून येतं. म्हणून आता केवळ १२ जुलैपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यानंतर मोठ्या पडद्यावर रांगडेपणाचा अस्सल अनुभव प्रेक्षकांना घेता येणार आहे.

# मुखेड येथे सेवापूर्ती गौरव व निरोप समारंभ संपन्न!

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक सी.पी.कदम यांचा सेवापुर्ती गौरव समारंभ मुखेड येथील भव्य आर्यवैश्य मंगल कार्यालयात संपन्न झाला. त्याप्रसंगी कदम चा सत्कार करतांना.तसेच पीएसअय विनोद चव्हाण मुखेडहून बदली झाली त्यामुळे त्यांचा निरोप समारंभ आणि नव्याने रुजु झालेले पिएसआय यांचे स्वागत व पोलीस पाटील माधव आण्णा टाकळे यांचा असा चौफेर कार्यक्रम शानदारपणे साजरा झाला. यावेळी अध्यक्ष म्हणून शिवाजी जाधव हे लाभले होते. प्रमुख अतिथी प्रदेश काँग्रेस सचीव डॉ.श्रावण रॅपनवाड, जिल्हा प्रवक्ते दिलिप कोडगिरे, सदाशिवराव पाटील, गंगाधर पाटील, राम सावकार पत्तेवार उपस्थीत होते. कदमचा चहाता वर्ग व पत्रकार बंधु मोठ्या प्रमाणावर उपस्थीती होते. चंपती कदम निवृत्तीनंतरच जीवन सुखासमाधानाने आणि आरोग्यसंपन्न जावे अशा शुभेच्छा उपस्थीत सर्वांकडून देण्यात आल्या. सुत्रसंचलन पत्रकार शेख महेताब यांनी केले.कार्यक्रम मुखेड पोलीस स्टेशनचे पिआय लक्ष्मण केंद्रे च्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पुढाकाराने सर्व सहकार्यांनी यशस्वी केला.



# किशोर कुबडे यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा थाटात साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**साईनाथ हमदे**

**उमरी :** किशोर कुबडे हे पूर्ण निष्ठेने दिवटी बजावळी लास्ट परियंत हे डिव्हिजन 7अंतर्गत शाखा क्र 243 मरी येथे होते. दि. 2जुलै रोजी यांची सेवा पूर्ण झाली. सर्वांनी स्वागत समारंभ सुरळीत पार पाडला उपस्तित, कॉलनी इंचार्ज वागतकर, जाधव, व्ही.के. हंबर्डे. सावंत साहेब गोरटेकर. बालाजी पवार राष्ट्रवादी जिल्हा उपअध्यक्ष नांदेड, ज्ञानेश्वर पाटील कदम राष्ट्रवादी उमरी तालुका कार्याध्यक्ष, पाटांगळे मॅडम कनिष्ठ लिपिक. बरबडेकर, सुरडकर, नंदनवार साहेब. माधव राजुरे साहेब. वरताळकर साहेब वरिष्ठ लिपिक. गोविंद ढगे इज्जत गावकर. रुखमाजी करपे गोरठेकर. राजू सुरोड. सुरेश सुरोड. पांडुरंग हम दे साईनाथ शिलेवाड, अमोल कुबडे, रावसाहेब नागोराव सावळे, रमेश बाबुराव शिंदे, संजय पंढरीनाथ तळेगावकर, शिवानंद रत्नपारखे हे उपस्तित होते.

# मुख्यमंत्री शिंदे यांनी व्हिडिओ कॉलद्वारे साधला अम्माशी संवाद

## डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या वतीने होणार अम्माचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या मातोश्री गंगुबाई उर्फ अम्मा यांच्या वतीने "अम्मा का टिफिन" उपक्रम राबविला जात आहे. सदर उपक्रमाची दखल राज्यपातळीवर घेतली गेली असून, या उपक्रमाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अम्माशी संवाद साधत उपक्रमाला शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच अम्माच्या या सेवाभावी उपक्रमाबद्दल डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या वतीने नव दुर्गा पुरस्काराने अम्माचा सत्कार केला जाणार असून या सत्कार सोहळ्याचे आमंत्रण मुख्यमंत्री यांनी अम्माला दिले आहे.

आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपूरात सुरू असलेल्या "अम्मा का टिफिन" उपक्रमाची सर्वत्र चर्चा होत आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री आमदार बाळासाहेब थोरात, अन्नपुरवठा मंत्री छगन भुजबळ, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री जयंत पाठील, सिनेमा दिग्दर्शक नागराज मंजुळे, युकेचे जनरल सेक्रेटरी  जॉन एम निकेल यांच्यासह अनेक सामाजिक संस्थांनी या उपक्रमाला भेट देऊन कौतुक केले आहे. सदर उपक्रमांतर्गत अत्यंत गरजू व्यक्तींना दररोज जेवणाचा टिफिन घरपोच पोहोचविला जातो. विशेष म्हणजे, आमदार किशोर जोरगेवार यांच्या निवासस्थानी सदर टिफिन तयार केला जातो. त्यानंतर गरजूंच्या घरी पोहोचविला जातो. आज या उपक्रमाला तीन वर्षे पूर्ण झाली असून या सेवेत एकदाही खंड पडलेला नाही, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे. या उपक्रमाच्या नियोजनबद्धतेचे अनेकांकडून कौतुक करण्यात आले आहे. महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतलेल्या एकनाथ शिंदे यांनी अम्माशी दूरध्वनीवरून संपर्क साधत आशीर्वाद घेतला होता. तसेच यावेळी त्यांनी "अम्मा का टिफिन" उपक्रमाबद्दलही माहिती जाणून घेतली होती. त्यानंतर आज रविवारी पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून अम्माशी संवाद साधत मुंबई येण्याचे आमंत्रण दिले आहे. सोबतच डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या वतीने अम्माचा सत्कार केला जाणार असल्याचे जाहीर करत अम्माला निमंत्रण दिले आहे. सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि विकासात्मक उपक्रमांद्वारे समाजाच्या गरजू घटकांची सेवा करण्याचे काम डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या वतीने केले जात आहे. सोबतच समाजात उत्तम काम करणाऱ्या महिलांचा सत्कारही या फाउंडेशनच्या वतीने केला जातो. यंदा सदर पुरस्कार गंगुबाई उर्फ अम्मा यांना घोषित करण्यात आला असून अम्माला नवदुर्गा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.  सेवाभावी उपक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रोत्साहन देत असतात. आमच्या उपक्रमाची मुख्यमंत्री यांनी दखल घेतली ही आमच्या "अम्मा का टिफिन" टीमसाठी गौरवाची बाब आहे. यामुळे आमचा उत्साह वाढला असून पुढे हे काम आणखी गतीने करत गरजूंना त्यांच्या हक्काची भाकर देण्यासाठी आम्हाला प्रोत्साहन मिळाले असल्याची प्रतिक्रिया अम्मा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बोलल्यानंतर दिली आहे.

# विधानसभा बहुमताने जिंकण्यासाठी जोमाने कामाला लागावे : आशाताई शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** कलंबर सर्कलमधील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची जनसंवाद बैठक व दौरा काल दि.०७ जुलै रविवारी शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई श्यामसुंदर शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी आशाताई शिंदे यांनी कलंबर सर्कलमधील प्रमुख पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या समवेत रायवाडी येथील नंदीचे दर्शन घेतले. यावेळी नंदिकेश्वर मंदिर कमिटी रायवाडीच्या वतीने व कलंबर सर्कल मधील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या वतीने आशाताई शिंदे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना आशाताई शिंदे म्हणाल्या की,आगामी  विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीकडून तिकीट



आपल्यालाच फायनल असून सर्व कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आगामी विधानसभेची निवडणूक प्रचंड बहुमताने जिंकण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागण्याचे आवाहन यावेळी आशाताई शिंदे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले. या जनसंवाद बैठक कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पारडीचे माजी सरपंच दिगंबर पाटील डिकळे, शेतकरी कामगार पक्षाचे नांदेड ग्रामीण जिल्हाध्यक्ष अवधूत पाटील शिंदे हरबळकर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष शेख शेरूभाई, लोहा कृ. उ. बाजार समितीचे संचालक प्रतिनिधी विश्वंभर पाटील क्षिरसागर, लोहा तालुका समन्वय समितीचे सदस्य सिद्धू पाटील वडजे, शेतकरी कामगार पक्षाचे लोहा तालुका अध्यक्ष नागेश पाटील हिलाल, काबेगावचे  सरपंच दुलेखान पठाण, आजमवाडीचे उपसरपंच अशोक गीते, कलंबर चे उपसरपंच माधव मोकले, लोहा बाजार समितीचे संचालक माणिकराव पाटील वाकडे, जोशीसांगवी सरपंच विक्रम पाटील मोरे, प्रदीप हुंबाड, ज्ञानेश्वर ताटे, पोखरभोसी माजी सरपंच बबरू पाटील ताटे, शेलगाव उपसरपंच रामेश्वर पाटील जाधव, डि.के. कांबळे कलंबरकर, शेकाप अल्पसंख्यांक लोहा तालुका अध्यक्ष फैयाज शेख सह कलंबर सर्कल मधील सरपंच, उपसरपंच, सेवा सोसायटीचे चेअरमन, तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील सह प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी, गावकरी मोठ्या संख्येने या जनसंवाद बैठकीस उपस्थित होते.

# फुलंब्री तालुक्यातील ग्रामरोजगार सेवकांना हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते टॅबचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ७१ ग्रामपंचायतीतील ग्रामरोजगार सेवकांना आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते मोबाईल टॅबचे वाटप करण्यात आले. रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मोबाईल टॅब फायदेशीर ठरेल, विशेषत : रोजगार हमी योजनेतील गैरवापर रोखण्यासाठी आणि प्रत्यक्षात कामगारांना सार्वजनिक कामावर यावे यासाठी सरकारने ऑनलाइन हजेरी प्रणाली सुरू केली आहे. काम करा, या माध्यमातून कामगार प्रत्यक्षात कामावर येतात की नाही हे कळणार आहे, विशेष म्हणजे टॅबच्या मदतीने कामगारांना सकाळी आणि संध्याकाळी दोन वेळेस हजर राहणे बंधनकारक केले आहे. या कार्यक्रमानंतर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य शिवाजीराव पाथ्रीकर, अनुराधा चव्हाण, जितेंद्र जैस्वाल, शहराध्यक्ष सुहास शिरसाठ, माजी सभापती सर्जेराव मेटे, माजी उपाध्यक्ष संजय त्रिभुवन, माजी पंचायत समिती सदस्या ऐश्वर्या गाडेकर तालुक्यातील ग्रामसेवक व ग्रामरोजगार सेवक, गटविकास अधिकारी उषा मोरे व मनरेगा कर्मचारी आदी उपस्थित होते.



# पाऊस नसल्याने कपाशी, तूर पिके तानावर

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** तालुक्यात गेल्या १५ दिवसांपासून अनेक भागांतील पाऊस गायब असल्याने पिकांना ताण बसू लागला आहे. सोयाबीन, तूर कपाशीचे वाढीच्या स्थितीत आहे. या काळाता पिकांना ओलाव्याची नितांत गरज आहे. सिंचनाची सोय असलेले शेतकरी पिकाला पाणी देण्याची धडपड करीत आहेत. परंतु कोरडवाहू शेतकरी वरुणराजाची वाट पाहत आहेत,पैठण तालुक्यातील बहुतांश गावात जुनच्या पंधरवड्यात पाऊस झाला होता. त्यानंतर आता जवळपास 20 दिवसांमध्ये पाऊस झालेला नाही. या वर्षी असमतोल स्वरूपाचा पाऊस झाल्याने अनेक तालुक्यांत पावसाची सरासरी कमी आहे.

# रामेश्वर विद्यालयाचा वाघोळा माळरानावर निंबोळी बीजरोपण कार्यक्रम उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :**  रामेश्वर विद्यालयात पर्यावरण आयामा अंतर्गत निंबोळी बिजारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वाघोळ्याच्या माळरानावर हजारो निंबोळी बियांचे बिजारोपण करण्यात आले, सन २००९ पासून चालू झालेल्या या उपक्रमाचे हे चौदावे वर्ष आहे, या बिजारोपणातून शेकडो निंबाची झाड या परिसरात बाळस  धरतानी दिसत आहे, या उपक्रमातून विद्यार्थ्यांना निसर्ग प्रेमाचा संस्कार तर वाघोळा या गावला निसर्ग संपन्नतेचे गतवैभव प्राप्त होण्यास मदत होणार आहे,या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री रामेश्वर विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष माननीय श्री.विकासराव गायकवाड हे होते. त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.श्री रावसाहेब गाडेकर (मुख्याध्यापक स्वामी विवेकानंद विद्यालय चित्ते पिंपळगाव), श्री लक्ष्मण मेमाने (मुख्याध्यापक श्री धर्मवीर संभाजी विद्यालय छत्रपती संभाजीनगर) उपस्थित होते.

यावेळी श्री रावसाहेब गाडेकर , श्री लक्ष्मण मेमाने यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण व आपली भूमिका याबद्दल मार्गदर्शन केले. पर्यावरण विषयी गीत विद्यालयाचे शिक्षक श्री मेश्राम जी. सी. यांनी गायिले.संस्थेचे आयाम प्रमुख श्री गजानन हरकळ( संत तुकाराम विद्यालय शिंगी), श्री विलास उबाळे, महेश कुलकर्णी, दाभाडे सर(धर्मवीर संभाजी विद्यालय), प्रदीप वैद्य (स्वामी विवेकानंद विद्यालय), श्री एकनाथ सोनवणे, श्री अभिमान पवार (जुनेश्वर विद्यालय),फुले सर (त्र्यंबकेश्वर विद्यालय), श्री बळीराम मुरमे (संत गाडगेबाबा आश्रम शाळा अंजनडोह), श्री राठोड सर व ढाकणे सर (संत भगवान बाबा आश्रमशाळा अन्वी) इत्यादी पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था या संस्कार केंद्रातून उपस्थित होते. शालेय परिसरातील डोंगरावर निंबोळी बिया, सिताफळ बिया, जांभूळ बिया, आंबा(कोय) बिया,अशा एकूण 65 ते 70 हजार बियांची लागवड परिसरात विद्यार्थ्यांनी उत्साहात लागवड करण्यात केली. तसेच विद्यालयातील सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षक तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री संतराम मोरे सर यांनी केले. निंबोळी पेरणी कार्यक्रमाचे शाळेतील नियोजन पर्यावरण प्रमुख श्री व्यवहारे के. एस. यांनी केले.सर्व शिक्षकांचे आयाम प्रमुखांचे मुख्याध्यापकांचे स्वागत श्री रामेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री उबाळे बी.एम.यांनी केले व सर्वांचे आभार मानले.



# लोकल पकडताना महिला पाय घसरुन पडली

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पनवेलहून ठाण्याकडे जाणारी लोकल सकाळी ९.३० च्या सुमारास सीबीडी बेलापूर या स्थानकात येत होती. त्यावेळी एक महिला पाय घसरुन रुळावर पडली. तिच्या अंगावरुन रेल्वेचा पहिला डबा गेला. या घटनेमुळे प्रवासी आणि रेल्वे प्रशासन यांची तारांबळ झाली. रेल्वे पोलीस आणि रेल्वे प्रशासनाने काही वेळातच ट्रेन मागे घेतली आणि या महिलेचा जीव वाचवला. मात्र या घटनेत महिलेला तिचे पाय गमवावे लागले आहेत. हिला लोकल ट्रेनखाली आल्याने अचानक लोकांनी तिथे गर्दी केली. मात्र पोलिसांनी वेळीच त्या ठिकाणी येत गर्दीवर नियंत्रण आणलं. या महिलेला जेव्हा बाहेर काढलं तेव्हा तिचे पाय रक्काळलेले होते. दोन पोलिसांनी तातडीने उडी मारुन तिला ट्रॅकच्या मधून बाहेर काढलं. लोक या घटनेचा व्हिडीओ काढत होते. या महिलेचा जीव वाचला असला तरीही तिचे पाय तिला गमवावे लागले आहेत. लोकांनीही हळहळ व्यक्त केली. सर्व आपत्कालीन यंत्रणांना हाय अलर्टवर राहण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. गरज असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे. मुंबई मनपा, पोलीस प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणेला सहकार्य करावे असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

# माऊलींच्या जयघोषात दिंड्या पंढरपूरकडे

## गावागावांत दिंडीचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**भोकरदन :** ज्ञानोबा माऊली म्हणत लाखो वारकरी श्री क्षेत्र पंढरपूरकडे जाताना दिसत आहे. शेकडो दिंड्या भगव्या पताका टाळ मृदुंग विना याच्या हरिनामाचा जयघोष करत पंढरपूर कडे चालल्या आहे. दिंड्यांचे गावोगावी फुलेपुष टाकुन स्वागत गावकरी करतना दिसत आहे. ज्या गावात दींडी जाते त्या गावातून गावकरी दिंडीचे स्वागत करत असतात स्वागत झाल्यानंतर मग हरिपाठ कीर्तन आणि नंतर गावकर्यार्मात महाप्रसाद होतो. परत सकाळी उठून काकडा आरती आणि नंतर चहा नाष्टा होतो आणि परत दिंडी आपल्या मार्ग प्रमाने मार्गस्थ होत असते असा दिनक्रम चालू असतो यात लाखो वारकरी पायी चालून विठ्ठल रुक्मिणी याचे दर्शन घेण्यासाठी चालत असतो उन वारा पाऊस याची तमा न बाळगता हे वारकरी शेकडो किलोमीटर चा प्रवास करत असतात. दिंडी मध्ये वेगवेगळ्या गावाचे वारकरी असतात सर्व मतभेद विसरून हे वारकरी जात पात विसरून एका परिवारासारखे राहताना दिसते यात वारकरी संप्रदायामध्ये नव्वद वर्षाचे वारकरी ही दिसतात आणि आठरा वर्षाचे तरूण तरूणी सुध्धा या वारीमध्ये चालताना दिसतात दिंडी मध्ये दिंडी चालक महाराज सर्वाची आवर्जून चौकशी करीत असतात दिंडीची दहा ते बारा लहान मोठी वाहने सोबत असतात. कुणी चालतना दमले तर लगेच वाहनात बसून आपल्या ठिकाणी पोहचतात. दध्नेश्वर शिवालय दहिगाव ने वै.कृष्णदेव महाराज काळे याच्या कृपा आशीर्वादाने दध्नेश्वर शिवालय ते पंढरपूर ही दिंडी पंढरपूर कडे जातना रवाना होते आता दिंडी चे चालक सुदाम महाराज शास्त्री हे असून ते दिंडी घेऊन पंढरपूर कडे पायी वारी चालत एका घाटातून जातना घेतलेले क्षणचित्रे.



# मेघदूतमधील काव्यरचनांमधून समाजात प्रेम, ममत्व अपेक्षित

## कालिदास दिन कार्यक्रमात प्रो. त्रिपाठी यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर** : महाकवी कालिदासांच्या मेघदूत मधील काव्यरचनांमधून समाजात प्रेम, ममत्व अपेक्षित आहे असे मत भोपाळ येथील महर्षी वैश्विक विश्वविद्यालयाचे आचार्य प्रो. निलिम्पा त्रिपाठी यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी आणि साहित्य भारती यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी मसापच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात कालिदास दिनानिमित्त 'आषाढस्य प्रथम दिवसे' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी जेष्ठ लेखक बाबा भांड हे होते. यावेळी व्यासपीठावर हिंदी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष डा. शीतलाप्रसाद दुबे, साहित्य भारतीचे संघटन मंत्री नितीन केळकर, प्रदेशाध्यक्ष दत्ता जोशी, अकादमीचे सचिव सचिन निंबाळकर,प्रा. भारती गोरे यांची उपस्थिती होती आपल्या भाषणात त्रिपाठी यांनी कालिदासांच्या काव्याचा आढावा घेतला. वेरुळ येथील घृष्णेश्वर मंदिराची पौराणिक कथा विशद करून छत्रपती संभाजीनगरचा परिसर हा महादेवाच्या स्पर्शाने पुनित झाला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात बाबा भांड यांनी साहित्य भारतीच्या उपक्रमाला शुभेच्छा देत महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर भाष्य केले. केळकर यांनी साहित्य भारतीच्या राज्यात चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली व साहित्य भारतीचे कार्य विस्तारण्याची गरज प्रतिपादन केली. छत्रपती संभाजीनगरची जिल्हा कार्यकारिणी त्यांनी घोषित केली. प्रास्ताविक दत्ता जोशी तर आभार सचिन निंबाळकर यांनी मानले. दुस-या सत्रात नवनाथ पवार लिखित 'साहित्य सागर कालिदास' या लघुनाटिकेचे सादरीकरण करण्यात आले.





# मक्रणपूर येथील अनिल वने यांचा सेवापूर्ती सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** दिनांक ५ जुलै रोजी शहराजवळील असणारे मक्रणपूर येथे देशाच्या रक्षणासाठी गेल्या १७ अथक परीश्रम घेऊन व कित्येक वर्षांपासून आपल्या कुटुंबाला दूर ठेऊन अखंड देश सेवा करून इंडियन आर्मी इंजिनिअर रेजिमेंट मधून अनिल वने सेवानिवृत्त झाल्याबद्दल समस्त गावकरी यांच्या कडुन मक्रणपुर गावातुन फौजी वणे यांची मिरवणुक काढून सत्कार सोहळा करण्यात आला या वेळी अध्यक्षस्थानी उद्योजक मनोज पवार, शिवसेना जिल्हा प्रमुख भरतसिंग राजपत, भाजपा तालुका अध्यक्ष किशोर पवार, सभापती मनोज राठोड, गोकुळसिंग राजपुत यांची प्रमुख उपस्थीती होती सर्वसाधारण कुटुंबातील युवा वर्गाने अनिल वने यांचा आदर्श घेतला पाहीजे स्वतःला देश सेवेसाठी समर्पण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. असे मनोज पवार यांनी उपस्थित युवा वर्गाला आपल्या भाषणातून मार्गदर्शन केले. या वेळी कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रविण दाभाडे प्रास्तावीक गोरख पाटील यांनी केले. यावेळी फौजी वणे बोलतांनी म्हणाले की फौज मध्ये फौजी उन्हा तान्हाची परवा न करतो जिवाच रान करून आपली देश सेवा बजावत असतो नागरीकांनी प्रत्येकी फौजी यांना मान सन्मान दिला तर तो स्व : हा जिव देण्याला कमी करणार नाही मी आता पर्यत देश सेवा केली आता समाज सेवा करणार आहे असे या वेळी म्हणाले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोरख पाटील, यमाजी वणे, पोपट लोंढे, संतोष जाधव , सुभाष बोडखे, सचिन सुरडकर, विनोद लोढे फेरोज शहा अनिल विघे यांनी परीश्रम घेतले. या वेळी सरपंच अस्लम शेख, उपसरपंच विनायक, तंटामुक्त अध्यक्ष तय्यब शहा अनवर, आसिफ शेख, सुबान शेख, रब्बानी शेख, आसीफ बॉन्ड, विजय जाधव, उदप गवळी, सादिक सैय्यद, दिपक घुगे, बाळु आव्हाड, भाऊसाहेब विघे, मोईन शेख व ग्रामस्थ यांची उपस्थीती होती.

# धावत्या दुचाकीवर रील बनवताना गमावला जीव; कठड्याला धडकल्याने एक ठार

## जखमीच्या दोन्ही पायांचा चुराडा

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रिल्सच्या नादात कार दरीत कोसळून युवती मयत झाल्याची घटना ताजी असतानाच बीडमध्येही रिल्सच्या नादात एकाचा जीव गेला आहे. जालन्याहून तुळजापूरला निघालेल्या दीन मित्रांनी धावत्या दुचाकीवर रिल्स बनवली. यावेळी चालकाचे नियंत्रण सुटल्याने दुचाकी कठड्याला धडकून अपघात झाला. यात मागे बसलेला एक जण जागीच ठार झाला तर दुसरा गंभीर जखमी असून त्याच्या दोन्ही पायांचा चुराडा झाला आहे. ही घटना शुक्रवारी दुपारच्यावेळी बीड बायपासवर घडली. हे दोन्ही मित्र जालना येथील रहिवाशी आहेत. अनिरूद्ध कळकुंबे (वय २५) असे मयताचे नाव आहे. तर मधु शेळके (वय ३० दोघेही रा. गणेशपुर, जालना) हा जखमी आहे. दोघेही शुक्रवारी सकाळीच दुचाकीवरून (एमएच २१ एम ११५४) बीडमार्गे तुळजापूरला जात होते. मधु हा दुचाकी चालवत होता तर अनिरूद्ध मागे बसलेला होता. बीड बायपासवर आल्यावर दुचाकीवर असतानाच अनिरूद्ध याने आपल्या मोन्नाईल रिल्स बनवण्यासाठी व्हिडीओ तयार करू लागला. यावेळी दुचाकी चालक असलेल्या मधुचे लक्ष विचलीत झाले असून बाजूच्या कठड्यावर जावून दुचाकी आदळली, यामध्ये डोक्याला व छातीला मार लागल्याने अनिरुद्धचा जागीच मृत्यू झाला तर



कठडा व दुरपर्यंत फरपटत गेल्याने मधुच्या दोन्ही पायांचा चुराडा झाला. हा सर्व प्रकार व्हिडीओमध्ये कैद झाला असून तो सोशल मिडयावरही व्हायरल झाला आहे. या दोघांनाही जिल्हा रूग्णालयात दाखल केले होते. जखमीला छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आले होते. याप्रकरणाची शनिवारी दुपारपर्यंत बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात नोंद झाला नव्हता.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# 23 लाभार्थ्यांना 2 कोटी 73 लाखांचे धनादेश वाटप

## सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने प्रकल्पग्रस्तांना पूनर्वसन पॅकेज

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भद्रावती तालुक्यातील कर्नाटका पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड या खुल्या कोळसा खाणीमुळे बरांज मोकासा, चेक बरांज, तांडा आणि पिपरबोडी गावांचा गत 15 वर्षांपासून रखडलेला पुनर्वसनाचा प्रश्न राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने निकाली निघाला आहे. प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांबाबत पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून 328 कुटुंबांना 40 कोटींचे पुनर्वसन पॅकेज जाहीर झाले आहे. या अंतर्गत शुक्रवारी नियोजन भवन येथे 23 लाभार्थ्यांना 2 कोटी 73 लाखांचे धनादेश वाटप पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, अपर



पोलिस अधीक्षक रिना जनबंधू, महानगर पालिका आयुक्त विपीन पालीवाल, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार (भुसंपादन), अतुल जटाळे (पुनर्वसन), डॉ. मंगेश गुलवाडे, देवराव भोंगळे, नरेंद्र जीवतोडे, श्री. रमेश राजुरकर, बरांज मोकासाच्या सरपंचा मनिषा ठेंगणे, प्रवीण ठेंगणे आदी उपस्थित होते.

कर्नाटका पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड ही कोळखा खाण सन 2015 ते 2021 या कालावधीत बंद होती. खाण सुरू झाल्यानंतर कंपनीने प्रकल्पग्रस्तांना कोणताही मोबदला दिला नाही. प्रकल्पग्रस्त कुटुंबांना बंद काळातील पुनर्वसन पॅकेज मिळवून देण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला. या संदर्भात त्यांनी थेट केंद्रीय कोळखा मंत्री रेड्डी यांची दिल्ली येथे भेट घेऊन प्रकल्पग्रस्तांच्या समस्या मांडल्या. अखेर बरांज मोकासा, तांडा आणि चेकबरांज, पिपरबोडी येथील 328 कुटुंबांना 40 कोटींचे पुनर्वसन पॅकेज जाहीर झाले. यावेळी बोलतांना पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, मी कायम प्रकल्पग्रस्तांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. ज्यांच्या जमिनी गेल्या त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केंद्रीय कोळसा मंत्री किशन रेड्डी यांना चंद्रपुरात आणून नागरिकांच्या अडचणी सोडविण्यात येतील. ज्यांना पुनवर्सन पॅकेज अंतर्गत धनादेश मिळाले त्यांनी हे पैसे सुरक्षित ठेवावे. उर्वरीत नागरिकांनासुध्दा धनादेशाचे वाटप करण्यात येणार आहे. कोणीही पुनर्वसन पॅकेजपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाहीसुध्दा पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिली. या लाभार्थ्यांना मिळाले पुनर्वसन पॅकेज : बरांज मोकासा येथील श्यामराव बालपाणे, दौलत बालपाणे, सुधाकर बालपाणे, दादाजी निखाडे, ताराबाई पालकर, बबन सालुरकर, एकनाथ तुळनकर, अशोक पुनवटकर, मायाबाई देवगडे, सुशीला डहाके, शंकर काथवटे यांना, चेकबरांज येथील सुर्यभान ढोंगे, सुमन ढोंगे, संजय ढोंगे, लक्ष्मण कोवे, नीळकंठ मेश्राम यांना तर नोकरीच्या ऐवजी एकरकमी मोबदला म्हणून देवराव परचाके, भाऊराव परचाके, विश्वनाथ जिवतोडे, काशिनाथ जिवतोडे, शशिकला चालमुरे, परसराम घाटे, हनुमान भोयर या सर्वांना एकूण 2 कोटी 73 लक्ष रुपयांचे धनादेश वाटप करण्यात आले. मुख्यमंत्री सहायता निधीचे वाटप : पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते स्वाती हर्षल पारखी आणि लता बाळू गेडाम यांना मुख्यमंत्री सहायता निधीचा प्रत्येकी 1 लक्ष रुपयांचा धनादेश वाटप करण्यात आला.



# मकापिकावरील अमेरिकन लष्करी अळीच्या आक्रमणामुळे शेतकरी त्रस्त

## पावसामुळे दुबार पेरणीचे संकट...!

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**लोणी खुर्द :** थोड्याबहुत पावसावर लोणीखुर्द परिसरातील शेतकर्यानी पेरणी लागवड केली तोच पावसाने पाठ फिरवली आसुन बहुतांश ठिकाणी पीक पावसा आभारी वाळुन गेलेत तर काही ठिकाणी पीक मोडून टाकले आसुन दुबार पेरणीसाठी बळीराजा पावसाच्या प्रतीक्षेत आहे थोडेबहुत आलेल्यामकापिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाल्यानेवैजापुर तालुक्यासह लोणी खुर्द परीसरात मकापिकावर अमेरिकन लष्करी अळीने मोठ्या प्रमाणात आक्रमण केले आसुन शेतकरी ञस्त.झाले असून तालुका कुषी आधिकरी व्यंकट ठके यांच्या मार्गदर्शनानुसार कुषी परवेकक्षक डी व्ही पुंड ए.डी सपाटे साहेब कृषी सहाय्यक बोढरे मॅडम देशमुख.सोनटक्के पुंड मॅडम यांनी त्यांच्या सहकार्यांसह तातडीने मकाच्या शेतास भेट देऊन झालेल्या किडीच्या प्रादुर्भावाची पाहणी केली. येत्या खरीप हंगामातमकापिकावर या किडीचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका असून शेतकर्यांनी त्यासाठी सतर्क राहण्याचे आवाहन कुषी परवेकक्षक पुंड यांनी शेतकर्यांना केले आहे. अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भावमका,पीकावर अधिक आहे. त्यासाठी आपण सजग आणि सतर्क राहावे. ठिपक्यांमध्ये लहान केसदेखील दिसतात. ही कीडमकापिकाचे पाने खाऊन नुकसान करते. प्रथम अवस्थेतील अळी कोवळ्या पानावर उपजिवीका करते. पानावर खरवडून खाल्ल्यामुळे पानांवर पांढरे ठिपके दिसून येतात. दुसर्या व तिसर्या अवस्थेतील अळ्या कणसामध्ये शिरून पाने खायला सुरुवात करतात. कणसामध्ये या किडीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे पान उघडल्यानंतर पानावर एका रांगेत गोल छिद्रे दिसून येतात. मकाच्याएका मक्याच्या झाडावर एक किंवा जास्तीत जास्त दोन अळ्या आढळून येतात. पूर्ण वाढ झालेल्या अळ्या पाने खाऊन पानांच्या फक्त शिराच शिल्लक ठेवतात. मकापिकात सुरवातीच्या काळात पोंग्यामध्ये प्रादुर्भाव कमी दिसतो. परंतू, नंतरच्या अवस्थेत पूर्ण पोंग्याचे नुकसान होते. मक्याच्या एका झाडावर एक अळी असेल तर उत्पादनात जवळपास 20 ते 30 टक्क्यांपर्यंत घट येऊ शकते.

**अशी घ्यावी काळजी :** मकापिकामध्ये रोज निरीक्षणे घ्यावीत एकरी 4/5 पक्षिथांबे उभारावीत पिकांमध्ये पांढरा खिडकीच्या आकाराचे पट्टे दिसल्यास किंवा अळीचा प्रादुर्भाव दिसल्यास खालील औषधांची अळीच्या अवस्थेनुसार फवारणी करावी.
1) निंबोळी अर्क 1500 PPM – 50 एमएल – 10 लिटर पाणी
2) इमामेक्टीन बेंजोएट 5% 4 ग्रॅम – 10 लिटर पाणी
फवारणी सकाळी दहा वाजेपर्यंत किंवा संध्याकाळी चार वाजल्यानंतर करावी फवारणी करताना शेतकऱ्यांनी चश्मा, रुमाल, मास हॅन्ड ग्लोज, बूट, टोपी, इत्यादी गोष्टी घालूनच फवारणी करावी.
**कुषी परवेकक्षक डि. व्ही. पुंड**

सुरुवातीला परप्रांतीय मजुर गावी गेल्यामुळे मजुरांचा तुटवडा होता अशा परीस्थितीत जास्तीची मजुरी देऊन आम्हीमकालागवड केली मोलामहागाची खत बियाणे यात मोठ्या प्रमाणात खर्च झाला आता मोठ्या प्रमाणात लष्करी अळीचा प्रादुर्भाव जानवु लागल्याने मकापिकांचे उत्पन्न घटणाया भीती वाढली आहे.
**चांगदेव किटे शेतकरी तलवाडा**

# मोहम्मदिया उर्दू प्राथमिक शाळेतर्फे वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**मक्रणपूर :** येथील मोहम्मदिया उर्दू प्राथमिक शाळेच्या वतीने मक्रणपुर गावा मध्ये झाडे लावा झाडे जगवा असे बॅनर घेऊन रॅली काढण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध पोस्टर स्वःहाच्या हाताने तयार करून आणि घोषवाक्य देऊन झाडे लावा झाडे जगवा अशी जन जागृती देखील केली. या वेळी नोमान एजाज शेख, सुमेरा गयास शेख, व अलिना अमजद बागवान या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी मोहम्मदिया उर्दू प्रा.शाळेचे मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.





आधुनिक केसरी

**उरण येथे श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार व कार्याचा विविध उपक्रम व कार्यक्रमातून प्रचार व प्रसार करणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे रविवारी कडापे येथे डोंगर पायथ्याशी मुख्य रस्त्याच्या बाजूला भारतीय देशी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.**

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर